विकणे आहे
भेंडा खुर्द, ता. नेवासा
येथील मुख्य गल्लीतील
राहण्यास योग्य प्लॉट
योग्य किंमत आल्यास
तातडीने विकणे आहे.
संपर्क : +91 9850386599



दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रु. ४.०० I अंक २०४ I शुक्रवार ८ मे २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com







## महत्त्वाचे..

### सीता-समान माता-भगिनींना मारहाण का करता; खा. राऊत यांचा सवाल

नाशिक : शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देऊन भूसंपादनावेळी पोलिसांकडून शेतकऱ्यांना झालेल्या मराहाणीवरुन तीव्र संताप व्यक्त केला. विशेष म्हणजे संजय राऊत अर्धा तासाहून अधिकवेळ जिल्हाधिकारी कार्यालयात ठाण मांडून बसले होते, याचवेळी त्यांनी नाशिकचे पोलीस अधीक्षक आणि प्रांत अधिकारी पवन दत्ता यांच्यासोबतही फोनवरुन संबंधित भूसंपादन आणि मारहाण प्रकरणावरुन चर्चा केली. त्यामुळे, काही वेळातच जिल्हाधिकारी यांनी कार्यालय गाठले, तिथे संजय राऊत यांच्यासोबत त्यांनी चर्चा केली. संजय राऊत यांच्यासह शिवसैनिक, शेतकरी देखील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये ठाण मांडून बसले होते. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेऊन त्यांनी आपली भूमिका मांडली. तुम्हाला अधिकार कोणी दिला, तुमच्या घरीही आई बहिणी असतील ना, हा कोणता नियम आहे. माझ्याकडे व्हिडिओ आहेत, हे बरोबर नाही. शिवसेनेनं आंदोलन केल्यास कायदा सुव्यवस्थाचा प्रश्न निर्माण झाला तर आंदोलन शेवटपर्यंत जाईल, असा शब्दात संजय राऊत यांनी इशाराही दिला.

# ममता बॅनर्जींना राज्यपालांचा दणका!

## विधानसभा, मंत्रिमंडळ बरखास्त; १५ वर्षांच्या सत्ता पर्वाचा शेवट

- राजीनामा नाकारताच राज्यपालांनी वापरले घटनात्मक अधिकार
- तृणमूलमध्ये खळबळ; आमदार बैठकीलाही ९ जण गैरहजर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठा राजकीय भूकंप झाला असून राज्यपालांनी घटनात्मक अधिकारांचा वापर करत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे मंत्रिमंडळ आणि विधानसभा बरखास्त केली आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतरही मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यास नकार देणाऱ्या ममता बॅनर्जी यांना राज्यपालांनी मोठा धक्का दिला. या निर्णयामुळे तब्बल १५ वर्षे सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या सत्ता पर्वाचा अखेर झाला आहे.



निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी आमचा नैतिक विजय झाला असून जनतेने आम्हाला नाकारले नाही, असा दावा करत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. आमचा लढा भाजपविरोधात नव्हता, तर निवडणूक आयोगाविरोधात होता, असे वक्तव्य करत त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला होता.

मात्र, पराभवानंतरही सरकार कायम ठेवण्याच्या भूमिकेमुळे राज्यात घटनात्मक पेच निर्माण झाला. अखेर राज्यपाल आर. एन. रवी यांनी भारतीय संविधानातील अनुच्छेद १७४ (२) (बी) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करत विधानसभा आणि मंत्रिमंडळ बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. याबाबतची गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली असून त्यावर बंगालचे मुख्य सचिव दुष्यंत नारियाला यांच्या स्वाक्षरी आहेत.

२०११ मध्ये डाव्यांची तब्बल ३४ वर्षांची सत्ता उलथवून ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये सत्तास्थापना केली होती. त्यानंतर सलग १५ वर्षे त्या मुख्यमंत्रीपदावर राहिल्या. मात्र यंदाच्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला. २९३ पैकी केवळ ८० जागांवर पक्षाला समाधान मानावे लागले.

दरम्यान, पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत खळबळ उडाल्याचे चित्र दिसत आहे. ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी पक्षाच्या आमदारांची बैठक बोलावली होती. मात्र या बैठकीला ८० पैकी ७१ आमदारच उपस्थित राहिले. तब्बल ९ आमदार गैरहजर राहिल्याने पक्षात फुट पडण्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

विधानसभेतील गटनेता निवडीसह आगामी राजकीय रणनीती ठरवण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र आमदारांच्या अनुपस्थितीमुळे तृणमूल काँग्रेसमधील अस्वस्थता स्पष्टपणे समोर आली आहे. विविध कारणांमुळे आमदार गैरहजर असल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला असला, तरी बंगालच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा आता जोर धरू लागली आहे.

### विजय थलपती सत्ता स्थापनेपासून अद्याप दूरच



**चेन्नई:** तमिळनाडूच्या राजकारणात नाट्यमय घडामोडी सुरु आहेत. पक्ष स्थापनेनंतरच्या पहिल्याच विधानसभा निवडणुकीत ब्लॉकबस्टर कामगिरी करणारा जोसेफ विजय यांचा टीव्हीके बहुमतापासून किंचित दूर आहे. विजय सत्ता स्थापनेपासून काही पावलं दूर आहेत. पण हेच अंतर कापताना त्यांच्या नाकीनऊ आले आहेत. टीव्हीकेचे सर्वे सर्वा विजय यांनी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेत सत्ता स्थापनेचा दावा केला. पण ११८ आमदारांच्या पाठिंब्याचं पत्र नसल्यानं राज्यपालांनी विजय यांना माघारी धाडलं. थलपती विजय यांनी गेल्या २४ तासांत दोनदा राज्यपालांची भेट घेतली आहे. दोन्ही वेळा राज्यपालांनी त्यांचा सत्ता स्थापनेचा दावा स्वीकारलेला नाही. राज्यपालांनी अद्याप हिरवा कंदिल दिलेला नसल्याचं विजय यांनी सांगितलं आहे.

## कुंडलिनी आणि आत्मसाक्षात्कार: एक जीवंत प्रक्रिया



'सहजयोग' भाग ४६

आपल्यातील कुंडलिनी शक्ती जागृत केल्याशिवाय काहीही साध्य होऊ शकत नाही, काहीही प्राप्त होऊ शकत नाही आणि दुसरा कोणताही मार्ग नाही. कारण परमात्म्याला मिळवण्यासाठी आणि त्याला जाणून घेण्यासाठी स्वतःच्या आत्म्याला जाणून घेणे अनिवार्य आहे. जोपर्यंत आपण आत्म्याला ओळखत नाही, तोपर्यंत परमात्म्याला कोणीही ओळखू शकत नाही; कारण आत्माच परमात्म्याला जाणून घेण्याची खरी शक्ती आहे. ज्याप्रमाणे आपले डोळे उघडल्याशिवाय आपण हे जग पाहू शकत नाही, त्याचप्रमाणे जोपर्यंत आपला आत्मा जागृत होत नाही, तोपर्यंत केवळ पोकळ गप्पा मारून परमात्म्याला जाणता येत नाही. हे सत्य आहे आणि यात शंका घेण्यासारखे काहीच नाही. यामुळे लोक नाराज झाले किंवा त्यांना वाईट वाटले, तरी जे सत्य आहे तेच मांडणे आवश्यक आहे. जर तुम्ही खरोखरच त्या परमात्म्याच्या शोधात निघाला असाल, जर तुम्ही खरे 'जिज्ञासू' (ढर्ऑश डशशज्ञशर्‍) असाल आणि तुमच्या हृदयात केवळ त्यालाच भेटण्याची ओढ असेल, तरच आपल्यात संवाद होऊ शकतो; अन्यथा चर्चा करण्याला काही अर्थ नाही. जेव्हा हा प्रकाश आपल्या आत येतो, तेव्हा अंतरातून शक्ती वाहू लागते हीच खरी वास्तविकता आहे. ही एक जीवंत प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे उत्क्रांतीच्या प्रवासात तुम्ही अमिबापासून मानव बनलात, त्याचप्रमाणे मानवापासून तुम्ही अधिक उच्च स्थिती प्राप्त करू शकता; पण ती त्याच नैसर्गिक मार्गाने घडेल. जोपर्यंत परमात्म्याशी आणि आत्म्याशी कनेक्शन जोडले जात नाही, तोपर्यंत इतर सर्व गोष्टी करण्यात काय अर्थ आहे? समजा, या उपकरणाचे मुख्य लाईनशी कनेक्शनच नसेल, तर मी बोलून काय फायदा? हे पूर्णपणे प्रॅक्टिकल आणि लॉजिकल आहे. - १३ डिसेंबर १९८०, मुंबई अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# कौटुंबिक वादातून पोटच्या मुलांचा गळा आवळून जंगलात टाकले

## चिमुरडीचा मृत्यू, मुलगा बचावला; निर्दयी बापाला अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा / निरगुडसर :** घरगुती वादातून भीषण गुन्हा झाल्याची धक्कादायक घटना आळेफाटा पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. पत्नी सोडून गेल्याच्या रागातून आणि घरातील सततच्या कटकटीला कंटाळून एका नराधम बापाने स्वतःच्या दोन चिमुरड्या मुलांचा गळा आवळून त्यांना जंगलात फेकून दिले. या हृदयद्रावक घटनेत ३.५ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला असून, ५ वर्षांचा मुलगा सुदैवाने बचावला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सागर सदाशिव शिंदे (वय २९, रा. मोशी, जि. पुणे) याची पत्नी सहा महिन्यांपूर्वी त्याला आणि मुलांना सोडून गेली होती. तेव्हापासून घरात सातत्याने वाद आणि कटकटी होत होत्या. याच रागातून ५ मे २०२६ रोजी सकाळी १०:३० च्या सुमारास सागरने आपली मुले आर्यन (वय ५ वर्षे) आणि हर्षदा (वय ३.५ वर्षे) यांना फिरायला नेतो असे सांगून घराबाहेर नेले. आरोपीने दोन्ही मुलांना आळेफाटा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निर्जन जंगलात नेले. रात्री ११:३० च्या सुमारास त्याने रागाच्या भरात दोघांचाही गळा आवळला. आर्यन मृत पावला आहे असे समजून त्याला तेथेच सोडून दिले, तर हर्षदाचा गळा दाबून खून करून तिचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने झाडाझुडपात फेकून दिला.

दुसऱ्या दिवशी ६ मे रोजी सकाळी ७:३० वाजता सागर एकटाच घरी परतला. मुलांबाबत विचारले असता त्याने ती चाकणला रूमवर आहेत असे खोटे सांगितले. मात्र, त्याच वेळी आळेफाटा परिसरात आर्यन हा मुलगा बेवारस स्थितीत पोलिसांना मिळून आला. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल ओंकार अशोक खुणे यांनी फिर्याद दिली असून, आळेफाटा पोलिसांनी आरोपी सागर शिंदे विरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास आळेफाटा पोलीस करत आहेत.



मुलगी हर्षदा शिंदे (वय ३.५) मुलगा आर्यन शिंदे (वय ५)

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित ४ हजाराहून अधिक लिंक्स ड्खढ तपास पथकातील सायबर विभागाने शोधल्या आहेत. सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट पुन्हा पुन्हा टाकणारी ४९१ अकाऊंट कायमचे बंद करण्यात आले आहेत. एसआयटी कडील तपास संवेदनशील असल्याने अधिक माहिती देऊ शकत नाही. १७ मार्च २०२६ रोजी या प्रकरणात पहिला गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे ६० दिवसांत दोषारोपपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे पुढील ४०-४५ दिवसांत ८ गुन्ह्यांचा तपास पूर्ण होईल. पीडितांना मनस्ताप होणार नाही याची समाज म्हणून आपण काळजी घेऊया, असंही तेजस्वी सातपुते यांनी म्हटलं.

# राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन घोटाळ्यात

## माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक अटकेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**बीड :** बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन व मावेजा घोटाळा प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना पोलिसांनी अटक केली आहे. लातूर येथून त्यांना ताब्यात घेण्यात आले असून याबाबत माहिती पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दूरध्वनीवरून दिली.

अटक केल्यानंतर अविनाश पाठक यांना बीड न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. त्याआधी दिवसभर त्यांची कसून चौकशी करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत सुरू असून या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

**७३ कोटींच्या मावेजा गैरव्यवहार प्रकरण**

**१० जणांविरोधात आधीच गुन्हा**

या घोटाळ्याप्रकरणी यापूर्वीच १० जणांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्ह्यातही अविनाश पाठक यांचे नाव समाविष्ट होते. या प्रकरणाचा तपास सुरुवातीला पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे होता. त्या रजेवर गेल्यानंतर तपास अधिकारी म्हणून एम. व्यंकटराम यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

**नेमके प्रकरण काय?**

बीड जिल्हा मधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांच्या मावेजा आणि जमिनींच्या संपादनात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. संपादित जमिनींचा मावेजा वाढवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या **(पान ४ वर)**

# कॅप्टन खरातचे घबाड ईडीच्या गळाला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोने, चांदी, डॉलरसह बेहिशोबी मालमत्तांचा डोंगर**

**शिर्डी :** कॅप्टन खरात याच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सोने, चांदी, अमेरिकन डॉलर तसेच मोठ्या प्रमाणात मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे प्रकरणात नवे धागेदोरे मिळाले असून तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

ईडीने यापूर्वी कॅप्टन खरात यांच्या निवासस्थानी व कार्यालयात झाडाझडती केली होती. त्यावेळी अनेक महत्त्वाची आर्थिक कागदपत्रे आणि खात्यांबाबत माहिती हाती लागल्याचे सांगितले जात आहे. तपासादरम्यान जगदंबा व समता पतसंस्थांमध्ये तसेच नाशिक येथील मुंबई नाका परिसरातील विश्वास को-ऑपरेटिव्ह बँकेत लॉकर असल्याचे निष्पन्न झाले.

विश्वास को-ऑपरेटिव्ह बँकेतील लॉकर उघडण्यात आल्यानंतर तब्बल एक कोटी दहा लाख रुपयांचे सोन्याचे दागिने, एक कोटी ८९ लाख रुपयांच्या चांदीच्या वस्तू तसेच ५५०० अमेरिकन डॉलर आढळल्याचे समजते. संबंधित लॉकर यापूर्वी गोठविण्यात आले होते. कुटुंबातील सदस्य उपस्थित नसल्याने ते उघडण्यात अडचणी येत होत्या. अखेर सृष्टी खरात यांच्या उपस्थितीत ईडीने लॉकर उघडले.

या लॉकरमधून मोठ्या प्रमाणावर जमिनींच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. पुणे, नाशिक व सोलापूर परिसरातील सुमारे ८० ते ९० मालमत्तांचे दस्तावेज आढळल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये काही बेनामी मालमत्तांचाही समावेश असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, ईडीकडून या सर्व मालमत्तेचा स्त्रोत, व्यवहारांची साखळी आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत सखोल तपास सुरू आहे.

# मंत्री सामंत यांच्याकडून शिवसेनेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

- शिवसेना पदाधिकाऱ्यांवर नाराजी : गटबाजी थांबवा, संघटना वाढवा
- कार्यकर्ता प्रशिक्षणासाठी मुरकुटेंना रत्नागिरीला येण्याचे निमंत्रण

**भरत थोरात । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री तथा शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख उदय सामंत यांनी श्रीरामपूर येथे आयोजित शिवसेनेच्या आढावा बैठकीत संघटनात्मक कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करत जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्याचा निर्णय जाहीर केला. बैठकीला अपेक्षित प्रमाणात पदाधिकारी उपस्थित नसणे, समन्वयाचा अभाव आणि वाढती गटबाजी यावर सामंत यांनी थेट बोट ठेवत कार्यकर्त्यांना स्पष्ट शब्दांत सुनावले.




शहरातील भास्करराव गलांडे पाटील सभागृहात गुरुवारी आयोजित बैठकीस अमोल खताळ, माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, भाऊसाहेब कांबळे, युवा संघटक सागर बेग, रविंद्र मोरे, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन औताडे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. मात्र बैठक सुरू होण्यापूर्वीच अनेक कार्यकर्ते सभागृहाच्या खाली उद्योगमंत्री सामंत यांना भेटून निघून गेल्याने सामंत संतप्त झाल्याचे दिसून आले.

बैठकीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर सामंत यांनी स्वतः माईक ताब्यात घेत कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला जिल्ह्याची जबाबदारी दिल्यानंतर संपूर्ण आढावा घेतला. मात्र पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय शून्य असल्याचे स्पष्ट झाले. गटबाजीमुळे **(पान ४ वर)**

### महिला पदाधिकाऱ्यांना शिवीगाळ व दमदाटी

**शिवसेनेच्या विद्यमान पदाधिकाऱ्यांनी महिला पदाधिकाऱ्यांना शिवीगाळ दमदाटी केल्याचे या बैठकीत समोर आले. बैठकीनंतर तब्येत बिघडल्याने संबंधित महिला पदाधिकाऱ्याला रुग्णालयात दाखल व्हावे लागले. इतर पदाधिकाऱ्यांनी ही संपर्कप्रमुख उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे आपली कैफियत मांडली. कार्यकर्त्यांचा रोष पाहता कार्यकारिणी बरखास्त करण्याचा निर्णय उद्योग मंत्र्यांनी जाहीर केला.**

# पुढील आठवड्यापासून ऊस उत्पादकांचे पैसे देणार

## ओंकार उद्योग समूहाचे प्रसिद्धी पत्रक; शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण
## सोशल मीडियावर बदनामी करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** ओंकार शुगर उद्योग समूह पुढील आठवड्यापासून ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि वाहतूकदारांची थकीत देणी अदा करण्यास सुरुवात करणार असल्याची माहिती उद्योग समूहाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिकृत पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. दैनिक राष्ट्र सह्याद्रीने उद्योग समूहाच्या आर्थिक अडचणी आणि शेतकऱ्यांच्या थकीत देयकांबाबत वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर हे स्पष्टीकरण समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.




प्रसिद्धी पत्रकानुसार, केंद्र सरकारच्या नव्या धोरणामुळे पेट्रोल-डिझेलमध्ये ३३ टक्के इथेनॉल मिश्रण करण्याचा निर्णय झाल्याने यावर्षीचे इथेनॉल आणि मोलॅसिस अद्याप विक्री झाले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे उद्योग**(पान ४ वर)**

## संपादकीय

# पडद्यावरचा नायक ते जनतेचा नेता

भारतीय राजकारण आणि चित्रपटसृष्टी यांचे नाते फार जुने आहे. देशातील अनेक अभिनेते आणि अभिनेत्री यांनी राजकारणात प्रवेश केला, काहींनी मोठे यश मिळवले तर काहींची राजकीय कारकीर्द पडद्यावरील चमकदार भूमिकांपुरतीच मर्यादित राहिली. पडद्यावर टाळ्या मिळवणाऱ्या अनेक कलाकारांना प्रत्यक्ष जनतेच्या प्रश्नांशी दोन हात करताना अपयश आले. मात्र दक्षिण भारतातील चित्र वेगळे आहे. तेथे अभिनेता हा केवळ मनोरंजन करणारा कलाकार नसतो, तर तो लोकांच्या भावविश्वाचा, श्रद्धेचा आणि आशेचा केंद्रबिंदू असतो. म्हणूनच तामिळनाडूत अभिनेता विजय थलपती यांच्या राजकीय उदयाने निर्माण झालेला भूकंप हा केवळ एका अभिनेत्याच्या लोकप्रियतेचा परिणाम नाही; तर दक्षिण भारतीय राजकारणाच्या परंपरेचा पुढचा अध्याय आहे.

तामिळनाडूच्या राजकारणात चित्रपटसृष्टीचे योगदान ऐतिहासिक राहिले आहे. एम. जी. रामचंद्रन, जे. जयललिता, एन. टी. रामाराव यांसारख्या अभिनेत्यांनी पडद्यावर मिळवलेले प्रेम राजकारणात मतांमध्ये रूपांतरित केले आणि जनतेच्या मनावर दीर्घकाळ अधिराज्य गाजवले. कारण त्यांनी राजकारण हा छंद म्हणून स्वीकारला नाही; तर समाजसेवेची जबाबदारी म्हणून अंगीकारला. पडद्यावर नायकाची भूमिका करणाऱ्या या कलाकारांनी प्रत्यक्ष आयुष्यातही लोकांच्या अडचणी समजून घेतल्या.

आज अभिनेता विजय थलपती यांच्याबाबतही असेच चित्र दिसत आहे. त्यांच्या तमिळगा वेत्री कळघम या पक्षाने तामिळनाडूच्या राजकारणात अल्पावधीत मोठी मुसंडी मारली आहे. विजय यांनी केवळ स्टारडमच्या बळावर राजकारणात प्रवेश केला नाही, तर त्यांनी गेली अनेक वर्षे चाहतावर्गाच्या माध्यमातून सामाजिक कार्याची मजबूत पायाभरणी केली. त्यांच्या चाहतामंडळांनी रक्तदान, मदतकार्य, विद्यार्थ्यांना सहाय्य यांसारखे उपक्रम राबवले. त्यामुळे त्यांची प्रतिमा सुपरस्टारपेक्षा लोकांचा माणूस अशी निर्माण झाली.

भारतातील अनेक कलाकारांनी राजकारणात नशीब आजमावले. काही लोकसभा किंवा विधानसभेत पोहोचले; मात्र बहुतेक जण राजकीय वास्तवात टिकू शकले नाहीत. कारण पडद्यावरील लोकप्रियता आणि प्रत्यक्ष नेतृत्व या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक अभिनेते निवडणूक जिंकून संसदेत गेले; पण मतदारसंघाशी नाळ जोडण्यात ते अपयशी ठरले. काहींना राजकारणातील संघर्ष, संघटनशक्ती आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क पेलला नाही. परिणामी जनतेमध्ये नाराजी निर्माण झाली आणि फेस व्हॅल्यूचा फुगा फुटला. उत्तर भारतात हे चित्र अनेकदा दिसून आले. ग्लॅमरच्या जोरावर निवडून आलेल्या अनेक कलाकारांना प्रशासन, धोरणे आणि जनतेच्या प्रश्नांची जाण नसल्याने अपयश आले. त्यामुळे अनेक मतदारांना आपण चुकीचा निर्णय घेतला अशी भावना निर्माण झाली. पण दाक्षिणात्य राज्यांमध्ये असे चित्र तुलनेने कमी दिसते. कारण तेथील अभिनेते जनतेच्या भावविश्वात खोलवर रुजलेले असतात. त्यांचा चित्रपटातील नायक हा गरीब, शोषित आणि सामान्य माणसासाठी लढणारा असतो. पडद्यावरील ही प्रतिमा ते प्रत्यक्ष राजकारणातही टिकवण्याचा प्रयत्न करतात.

तामिळनाडूमध्ये अभिनेत्यांना देवासारखे मानले जाते. त्यांच्या कटआऊटला दूध अर्पण केले जाते, मंदिरे बांधली जातात. मात्र हे केवळ अंधभक्तीचे परिणाम नाहीत. दक्षिणेतील अनेक अभिनेते समाजाशी सातत्याने जोडलेले राहिले. एम. करुणानिधी आणि एमजीआर यांच्या काळापासून तामिळनाडूमध्ये सिनेमा आणि राजकारण यांचे नाते सामाजिक परिवर्तनाशी जोडले गेले. द्रविड चळवळीने चित्रपटांचा वापर विचार पोहोचवण्यासाठी केला आणि त्यातून अभिनेता हा जननेता बनला.

विजय यांचा उदयही याच परंपरेचा भाग मानला जातो. त्यांनी युवक, बेरोजगारी, शिक्षण, नीट परीक्षा, भ्रष्टाचार यांसारख्या मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका घेतली. त्यांच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात महिलांसाठी कल्याणकारी योजना, युवकांसाठी रोजगार आणि प्रशासनातील पारदर्शकतेवर भर देण्यात आला. म्हणूनच त्यांच्या राजकारणाकडे लोक स्टारडम म्हणून नव्हे, तर पर्याय म्हणून पाहू लागले.

तथापि, राजकारणातील खरी परीक्षा आता सुरू होणार आहे. चित्रपटात दोन-अडीच तासांत समस्या सुटतात; पण प्रत्यक्ष सत्तेत निर्णय घेताना आर्थिक, सामाजिक आणि प्रशासनिक वास्तवाला सामोरे जावे लागते. विजय यांच्यासमोरही हीच मोठी कसोटी असेल. जनतेच्या अपेक्षा प्रचंड आहेत. पडद्यावरील थलपतीला आता प्रत्यक्ष प्रशासनातही नेतृत्व सिद्ध करावे लागेल.

भारतीय लोकशाहीत सिनेअभिनेत्यांचा सहभाग चुकीचा नाही. उलट समाजातील लोकप्रिय व्यक्तींनी सार्वजनिक जीवनात येणे हे लोकशाहीसाठी चांगलेच आहे. पण त्यासाठी प्रामाणिकपणा, अभ्यास, सातत्य आणि जनतेशी बांधिलकी आवश्यक असते. केवळ प्रसिद्धी, पैसा आणि चाहतावर्ग यांच्या बळावर राजकारणात दीर्घकाळ टिकता येत नाही. दक्षिण भारतातील काही अभिनेत्यांनी हे सिद्ध केले; म्हणूनच ते आजही लोकांच्या हृदयावर राज्य करतात.

आज विजय थलपती यांच्या रूपाने तामिळनाडूला नवा राजकीय चेहरा मिळत आहे. हा चेहरा किती यशस्वी ठरेल, हे भविष्यात स्पष्ट होईल. पण एक गोष्ट निश्चित दक्षिण भारतात अभिनेता जेव्हा राजकारणात उतरतो, तेव्हा तो फक्त पडद्यावरील नायक राहत नाही; तर तो जनतेच्या आशा-अपेक्षांचा चेहरा बनतो. आणि म्हणूनच दक्षिणेतील सिनेअभिनेते अनेकदा पडद्यावरच नाही, तर राजकारणातही सुपरहिट ठरतात.

# वांबोरीत जल जीवन योजनेचे काम पूर्ण

## जलपूजनाने जलोत्सव साजरा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** केंद्र सरकारच्या जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून, योजनेचे पाणी राहुरी तालुक्यातील वांबोरी गावात काल दाखल झाले. या निमित्ताने वांबोरी ग्रामपंचायत कार्यालयात जलपूजनचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी ज्येष्ठ नेते अ‍ॅड. सुभाषराव पाटील यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. यावेळी जल जीवन मिशनचे अधिकारी, सरपंच किरण ससाने, ग्रामविकास अधिकारी श्रीकांत साळे, विलास गुंजाळ, रविकिरण पटारे, शिवाजी भाकरे, जालू कांबळे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

याप्रसंगी संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की, रोड क्रॉसिंग, रेल्वे क्रॉसिंग आणि विविध प्रकारच्या परवानगी घेण्याच्या प्रक्रियेत ज्येष्ठ नेते अ‍ॅड. सुभाष पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक प्रशासकीय अडचणी दूर झाल्या. अ‍ॅड. पाटील यांनी सांगितले की, या योजनेचे औपचारिक उद्घाटन लवकरच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री व जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान वांबोरीतील जल जीवन योजनेचे काम पूर्ण झाल्यामुळे या परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## डॉ. बाळासाहेब विखे जयंती बेलापूर खुर्द येथे साजरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर खुर्द ग्रामपंचायत कार्यालयात पद्मभूषण स्व.डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पद्मभूषण स्व.डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपसरपंच व. दीपक बारहाते, सय्यद बाबा उरूस कमिटीचे अध्यक्ष गणेश महाडिक, प्रगतशील शेतकरी राधाभाऊ राजुळे, शशिकांत पुजारी, कामगार मोर्चा उत्तर नगर अ‍ॅडल्हाध्यक्ष विलास भालेराव, केशव गोविंद बन ट्रस्टचे विश्वस्त विनय भगत, समीर सय्यद, शिवाजी पुजारी, विलास बडधे आदी उपस्थित होते.




## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर वादळामुळे भरकटले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर आज दुपारी भरकटले. मात्र हेलिकॉप्टरच्या पायलटने वेळीच प्रसंगावधान दाखविल्याने ते वळवून जुहू पवनहंस येथे आणून त्याचे यशस्वीपणे लँडिंग करण्यात आले. या घटनेत कुणालाही कोणतीही इजा झाली नसून उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासहित हेलिकॉप्टरमधील सर्वजण सुखरूप आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज आपल्या पक्ष पदाधिकाऱ्यांच्या कुटुंबातील लग्नकार्यासाठी मुंबईहून मुरबाड जाण्यासाठी निघाले होते. दुपारी ३.३० वाजता महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅड वरून मुरबाड जाण्यासाठी त्यांच्या हेलिकॉप्टरने उड्डाण केले. मात्र हेलिकॉप्टर जेमतेम ऐरोलीपर्यंत पोहोचताच समोरून येणारे वादळ पायलटने पहिले. संभाव्य धोका ओळखून पायलटने वेळीच याबाबत उपमुख्यमंत्री शिंदे यांना अवगत केले. तसेच पुढे जाण्याऐवजी मागे वळावे लागेल असेही सांगितले. त्यानंतर त्याने तत्काळ हे हेलिकॉप्टर मागे वळवण्याचा निर्णय घेतला. पुढील काही मिनिटात हे हेलिकॉप्टर जुहू येथील पवनहंस येथे यशस्वी लँड झाले. यावेळी या हेलिकॉप्टरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासह त्यांचे स्वीय सहाय्यक प्रभाकर काळे, विशेष कार्य अधिकारी बालसिंह राजपूत, जनसंपर्क विभागाचे विशेष कार्य अधिकारी विनायक पात्रुडकर आणि सुरक्षा रक्षक तसेच विमान कंपनीचे प्रतिनिधी होते. हेलिकॉप्टरचे यशस्वी लँडिंग झाल्यानंतर हे सर्वजण उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह त्यांच्या निवासस्थानी रवाना झाले आहेत.

## जिल्हा ग्रामीण रुग्णालय उपसमितीवर रूपाली भागवत यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** येथील जिल्हा ग्रामीण रुग्णालय उपसमितीवर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. रूपाली सागर भागवत यांची निवड करण्यात आली. त्यांना निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले आहे.

आ. हेमंत ओगले यांच्या शिफारशीनुसार सदरची निवड करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष आ. हेमंत ओगले असून या समितीवर अगोदर नगरसेविका प्रणिती चव्हाण, अशासकीय संस्था प्रतिनिधी रवींद्र खिल्लारी, सामाजिक कार्यकर्ते अभिजित लिपटे, जिल्हा शल्य चिकित्सक, संजय घोगरे, गटविकास अधिकारी सुभाष म्हस्के, सार्वजनिक बांधकाम अभियंता बापूसाहेब वराळे, सहाय्यक आयुक्त पशु संवर्धन अधिकारी मच्छिंद्र कोते, तालुका वैद्यकीय अधिकारी मोहन शिंदे, वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय दीपक परदेशी यांची निवड करण्यात आलेली आहे. सामाजिक कार्यकर्त्या रूपाली भागवत यांची निवड झाल्याबद्दल झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## प्रवरेच्या केटीप्रमाणे सिंचन क्षेत्रातील सर्व तळी भरून द्या ; जिल्हाध्यक्ष औताडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव, :** भंडारदरा सिंचन प्रणालीच्या सुरू असलेल्या उन्हाळी आवर्तनातून प्रवरा नदीवरील केटी बंधारे भरून देण्याचा विचार जलसंपदा विभागाकडून सुरू आहे. मात्र, याच धर्तीवर भंडारदरा सिंचन क्षेत्रातील श्रीरामपूर, नेवासा, राहुरी व राहाता तालुक्यातील सर्व गावतळी, पाझर तलाव, ओढे-नाले, शिरपूर पॅटर्न बंधारे तसेच शेततळीही भरून द्यावीत, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी केली आहे.

औताडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सिंचन क्षेत्रातील ग्रामपंचायत हद्दीतील पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या तळ्यांना ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार जलसंपदा विभागाकडून पाणी दिले जाते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर शुल्कही आकारले जाते. काही गावांमध्ये एकापेक्षा अधिक तळी असूनही केवळ एका तळ्यासाठी मागणी केली जाते. त्यामुळे इतर तळी कोरडी राहतात.

काही ठिकाणी राजकारणामुळे सार्वजनिक पाणीपुरवठा असूनही तळ्यांसाठी अधिकृत मागणी होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. परिणामी संबंधित तळ्यांना पाणी मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

गोदावरी खोरे हे तुटीचे खोरे असून भंडारदरा व निळवंडे या दोन्ही धरण समूहात अद्याप किमान दहा टीएमसी पाण्याची कमतरता असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, सध्या दोन्ही धरणांत मिळून सुमारे सात टीएमसी पाणी शिल्लक असल्याने परिस्थिती तुलनेने चांगली आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून पश्चिमेकडे समुद्रात वाहून जाणारे पाणी वळविण्याचे प्रयत्न सुरू असल्याने सिंचन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यामुळे प्रवरा नदीवरील केटी बंधाऱ्यांप्रमाणेच सिंचन क्षेत्रातील सर्व गावतळी, पाझर तलाव व शेततळी भरून देण्यासाठी जलसंपदा विभागाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीस तालुका अध्यक्ष युवराज जगताप यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

## दक्षिणकाशी पुणतांबा तीर्थक्षेत्र विकासासाठी निधी द्या

### स्नेहलता कोल्हे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव, :** कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील तीर्थक्षेत्र विकासासाठी विशेष निधी मंजूर करावा, अशी मागणी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पुणतांबा हे दक्षिणकाशी म्हणून ओळखले जाते. येथील श्री योगीराज चांगदेव महाराज व कार्तिकस्वामी महाराज मंदिर तीर्थक्षेत्राचा विकास, गोदावरी नदीवरील घाटांची पुनर्बांधणी तसेच आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. स्नेहलताताई कोल्हे यांनी पत्रात नमूद केले आहे की, अहिल्यानगर जिल्ह्याला ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेला असून अनेक प्राचीन मंदिरे येथे आहेत. पुणतांबा गावातील श्री चांगदेव महाराज समाधी,



श्री कार्तिकस्वामी मंदिर तसेच गोदावरी नदीकाठी असलेले अहिल्यादेवी होळकर घाट, विठ्ठल घाट आणि ब्राह्मण घाट येथे राज्यभरातून हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. सन २०२७ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार असून त्यासाठी लाखो भाविक येणार आहेत.

त्याचा परिणाम पुणतांबा तीर्थक्षेत्रावरही होणार असल्याने येथे भाविकांच्या सोयीसाठी घाट पुनर्बांधणी व मूलभूत सुविधांचा विकास तातडीने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. पुणतांबा हे धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव असून येथे शेकडो वर्षांपूर्वीची अनेक पुरातन मंदिरे आहेत. या परिसराचा सर्वांगीण विकास करून तो अधिक आकर्षक करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. संबंधित विभागांना याबाबत योग्य त्या सूचना देऊन विशेष निधी मंजूर करावा, असे आवाहन स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केले आहे.

## गोटुंबे आखाडा परिसरात बिबट्याचा मुक्त संचार ; पिंजरा लावण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा परिसरात मागील तीन ते चार दिवसांपासून मध्यरात्रीच्या सुमारास मुक्त संचार करीत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यामुळे गोटुंबा आखाडा आणि परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार बिबट्या दर्शन देत असल्याने ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने उपाययोजना करून तातडीने पिंजरा लावण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, शनी शिंगणापूर रोडवर अनेक वेळा वाहन चालकांना बिबट्या दिसून आला आहे. तसेच अहिल्यानगर एमआयडीसी येथील कामाला असणारा कर्मचारी वर्ग रात्री उशिरा कामावरून घरी परतत असताना या परिसरात बिबट्या आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. चार ते पाच दिवसांपूर्वी एका मालवाहतूक पिकअप चालकाला बिबट्या दिसला होता. त्यानंतर त्याने परिसरातील नागरिकांना याबाबत माहिती दिली होती.काल रात्रीही एमआयडीसी परिसरातील काही तरुण रात्री एक वाजण्याच्या सुमारास पिंपरी अवघड येथे घरी परतत असताना गोटुंबे आखाडा येथे शनी शिंगणापूर रोडलगत बिबट्या दिसून आल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.



घडलेल्या या घटनेनंतर रात्रीच्या वेळी नागरिकांमध्ये बिबट्याची दहशत पसरली आहे. सध्या वाढत्या उष्णतेमुळे अनेक नागरिक घराबाहेर झोपत आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतमजुरांच्या सुरक्षेबाबत ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे.गोटुंबे आखाडा परिसरात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याने भविष्यात एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने तातडीने या घटनेची दखल घेऊन परिसरात पिंजरा लावावा व बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे. दरम्यान, नागरिकांनी रात्रीच्या वेळी एकटे बाहेर पडू नये, लहान मुलांना घराबाहेर एकटे सोडू नये तसेच सतर्क राहावे, असे आवाहन ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## गोंडेगावच्या येडुआई मंदिर जीर्णोद्धाराने दिला ग्रामीण एकोप्याचा आदर्श

**श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव हे गाव कायम राजकीय चर्चेत राहिले. गावातील दोन प्रमुख गट, त्यांचे राजकीय मतभेद, निवडणुकांतील संघर्ष आणि परस्परांतील आरोप-प्रत्यारोप हे चित्र अनेक वर्षे पाहायला मिळाले. मात्र या सर्व राजकीय मतभेदांवर ग्रामदैवत येडुआई मातेच्या भक्तीने मात केली आणि आज संपूर्ण गाव एका ध्येयासाठी एकदिलाने उभे ठाकले आहे. हे दृश्य केवळ गोंडेगावपुरते मर्यादित नाही; तर संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे.**

ग्रामदैवत म्हणजे गावाच्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि एकोप्याचा केंद्रबिंदू असतो. गावात कितीही राजकारण असले, मतभेद असले तरी देवापुढे सारे समान असतात, हीच ग्रामीण संस्कृतीची खरी ओळख आहे. गोंडेगावातील येडुआई मातेच्या मंदिर जीर्णोद्धाराच्या निर्णयाने हे पुन्हा अधोरेखित केले. शंभर वर्षांहून अधिक जुने असलेले येडुआई मातेचे मंदिर ग्रामस्थांच्या श्रद्धेचे स्थान आहे. अनेक वर्षे मंदिर जीर्णोद्धाराची चर्चा होत होती; मात्र ती प्रत्यक्षात येत नव्हती. पण गेल्या सात वर्षांपासून गावकऱ्यांनी यात्रा उत्सव आणि नवरात्र उत्सव एकत्र साजरा करण्याचा घेतलेला निर्णय गावातील एकात्मतेचे बीज ठरला. हळूहळू देवीचे मंदिर भव्य-दिव्य व्हावे हा विचार गावाच्या प्रत्येक घरात पोहोचला.

विशेष म्हणजे या कामात कोणताही राजकीय गट, जातीय विचार किंवा वैयक्तिक अहंकार आड आला नाही. सरपंच सागर बढे यांनी बैठकीत केलेले आवाहन महत्त्वाचे ठरले. हेवा-दावा, गट-तट विसरून फक्त देवीच्या मंदिरासाठी एकत्र या, या शब्दांनी ग्रामस्थांच्या मनाला हात घातला आणि संपूर्ण गावाने टाळ्यांच्या गजरात मंदिर जीर्णोद्धाराला संमती दिली. आजच्या काळात गावागावात राजकारणामुळे सामाजिक सलोखा बिघडताना दिसतो. ग्रामपंचायत निवडणुका असोत किंवा सहकारी संस्थांची

**गोंडेगावच्या नव्या सामाजिक एकतेचाही शुभारंभ**

**आज शुक्रवार, ८ मे रोजी श्री रामगिरीजी महाराज आणि कोपरगाव बेटाचे महंत श्री रमेशगिरीजी महाराज यांच्या हस्ते या शुभकार्याचा प्रारंभ होत आहे. हा केवळ मंदिराचा शुभारंभ नाही; तर गोंडेगावच्या नव्या सामाजिक एकतेचाही शुभारंभ आहे.**



राजकारणे मतभेद कायम टोकाला जातात. अनेक गावांमध्ये विकासकामे गटबाजीमुळे रखडतात. अशा परिस्थितीत गोंडेगावने दिलेला संदेश खूप मोठा आहे. गावाच्या विकासासाठी आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी एकोप्याशिवाय पर्याय नाही.

मंदिर बांधकामासाठी कुणी वाळू दिली, कुणी खडी, कुणी सिमेंट, कुणी स्टील तर अनेक भक्तांनी लाखो रुपयांच्या देणग्या दिल्या. ही केवळ आर्थिक मदत नाही; तर गावाच्या सामूहिक भावनेचे प्रतीक आहे. सुमारे दोन कोटी रुपयांच्या मंदिर जीर्णोद्धाराचा निर्णय गावाने एकमुखाने घेणे, हे आजच्या काळात अत्यंत दुर्मिळ उदाहरण म्हणावे लागेल. विशेष बाब म्हणजे मंदिरातील देवीचा तांदळा हलवायचा की नाही, या संवेदनशील विषयावरही ग्रामस्थांनी संयमाने आणि श्रद्धेने निर्णय घेतला. सराला बेट गोदाधामचे मठाधिपती हिंदुधर्मरक्षक गुरुवर्य श्री रामगिरीजी महाराज यांनी प्रत्यक्ष पाहणी करून देवीचा तांदळा हलवता येणार नाही असा निर्णय दिल्यानंतर ग्रामस्थांनी तो नम्रपणे स्वीकारला. यावरून गावकऱ्यांची श्रद्धा आणि परंपरेप्रती असलेला आदर दिसून येतो. ग्रामीण महाराष्ट्राची खरी ताकद ही त्याच्या एकोप्यात आहे. संकटाच्या काळात गाव एकत्र उभे राहते, हीच आपली संस्कृती आहे. गोंडेगावने ती परंपरा पुन्हा जिवंत केली आहे. जिल्ह्यातील आणि राज्यातील इतर गावांनीही या निर्णयातून प्रेरणा घेण्याची गरज आहे. कारण राजकारण क्षणिक असते; पण गावाचा विकास, संस्कृती आणि श्रद्धा कायम टिकणारी असते.गोंडेगावने आज दाखवून दिले की, गाव एकत्र आले की अशक्यही शक्य होते आणि देवही प्रसन्न होतो!

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घ्या

### युवक-युवतींना आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे,:** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६ अंतर्गत देशभरातील ३१ हजार ४८० हून अधिक जागांवर विविध नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत इंटर्नशिपचा कालावधी साधारण सहा किंवा नऊ महिन्यांचा असणार आहे. इंटर्नशिपदरम्यान उमेदवारांना दरमहा नऊ हजार रुपये इतके विद्यावेतन दिले जाणार असून इंटर्नशिप यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे. योजनेसाठी उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षांदरम्यान असावे. उमेदवार भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पदविका तसेच कला, विज्ञान, वाणिज्य, संगणक अनुप्रयोग, व्यवस्थापन, औषधनिर्माण आदी शाखांतील पदवीधर उमेदवार अर्ज करू शकतात. पूर्णवेळ नोकरी करणारे किंवा नियमित शिक्षण घेणारे उमेदवार पात्र राहणार नाहीत. मात्र ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेणारे तसेच अंतिम वर्षातील विद्यार्थी अर्ज करू शकतात. या योजनेत महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज ऑटो, रिलायन्स इंडस्ट्रीज, बजाज आलियान्झ जीवन विमा, बर्जर पेंट्स इंडिया, एमक्युअर फार्मास्युटिकल्स, होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया, बीव्हीजी इंडिया, कॉग्निझंट, आयबीएम इंडिया यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी मर्यादित कालावधीत प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त सुरेश वराडे यांनी केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com

owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## ‘सालबर्डी’ चित्रपटाच्या यशानिमित्त वैरागर यांचा सत्कार



**सोनई :** सुसंकल्प व सामाजिक संघटना, तरवडी यांच्या वतीने अभिनेते संजय वैरागर यांना नुकताच कला साहित्य भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ‘सालबर्डी’ चित्रपटाने यशस्वीरीत्या तिसऱ्या आठवड्यात पदार्पण केल्याबद्दल वडाळा बहिरोबा येथे जाणता राजा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे चेअरमन दिलीपराव मोटे यांच्या हस्ते वैरागर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना मोटे म्हणाले, ग्रामीण भागातील कथा आता मराठी चित्रपटसृष्टीत प्रभावीपणे पुढे येत असून मराठी चित्रपटांना चांगले दिवस आले आहेत. प्रेक्षक पुन्हा चित्रपटगृहांकडे वळत असल्याने ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. चित्रपट हा समाजाचा आरसा असल्याचेही त्यांनी सांगितले.संजय वैरागर यांनी ‘सालबर्डी’ चित्रपटाच्या यशाचे श्रेय योग्य नियोजन, दिग्दर्शक रमेश साहेबराव चौधरी यांचे मार्गदर्शन तसेच संपूर्ण टीमच्या मेहनतीला दिले. प्रेक्षकांनी चित्रपटाला भरभरून प्रतिसाद दिल्याने आनंद होत असल्याचे त्यांनी नमूद केले.सत्काराला उत्तर देताना वैरागर यांनी संस्थेचे आभार मानले. या चित्रपटासाठी संधी दिल्याबद्दल दिग्दर्शक रमेश चौधरी व निर्मात्यांचे विशेष आभार व्यक्त केले.यावेळी प्रभाकर डौले, अजित ठोंबळ, दत्तात्रय वैरागर आदी मान्यवर उपस्थित होते.

## अचूक जनगणना ही राष्ट्रीय नियोजनाचा पाया : बनकर

**श्रीरामपूर :** जनगणना हे केवळ आकडेवारीचे संकलन नसून देशाच्या भावी नियोजनाचा पाया असणारे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळे प्रगणक व पर्यवेक्षकांनी तांत्रिक सूक्ष्मता समजून घेऊन अत्यंत अचूक माहिती संकलित करावी, असे प्रतिपादन भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचे जनगणना निरीक्षक श्रीकांत बनकर यांनी केले.श्रीरामपूर येथील सी. डी. जैन महाविद्यालयात आयोजित जनगणना प्रशिक्षण वर्गाला त्यांनी भेट देऊन उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या तांत्रिक अडचणी जाणून घेतल्या व शंकांचे निरसन केले. त्यांच्या भेटीमुळे स्थानिक महसूल यंत्रणेतील कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावले असून कामाला प्रशासकीय गती मिळाल्याचे दिसून आले.

या प्रशिक्षण वर्गाचे विशेष आकर्षण ठरले ते उंडे वस्ती शाळेचे तंत्रस्नेही शिक्षक अनंत गोरे यांनी तयार केलेले ‘जनगणना जनजागृती व्हिडिओ गेम’. जनगणनेबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रश्नमंजुषा गेमची निर्मिती केली असून त्याचे सादरीकरण प्रशिक्षण वर्गात करण्यात आले. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे श्रीकांत बनकर यांनी विशेष कौतुक करत गोरे यांचा सत्कार केला.हे प्रशिक्षण शिबिर प्रांताधिकारी किरण सावंत पाटील व तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहाय्यक महसूल अधिकारी निलेश इंगळे, मास्टर ट्रेनर गणेश पिंगळे, योगेश राणे, निलेश राजवाळ, सचिनकुमार शिंदे, तंत्र सहाय्यक राजेश कवाने, नवनाथ कैतके, प्रसिद्धी विभाग प्रमुख शुभम पवार व संदीप पाळंदे यांनी नियोजन केले. प्रसंगी ज्येष्ठ शिक्षक नेते विजय काटकर यांनी श्रीकांत बनकर यांच्या मार्गदर्शनाचे कौतुक करून उपस्थितांचे आभार मानले. या प्रशिक्षण वर्गामुळे तालुक्यातील जनगणनेच्या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

## बाह्यरुग्ण विभागात सेवा दराचे फलक लावावेत : जाधव

**पुणतांबा :** डॉक्टरांनी बाह्यरुग्ण विभागात देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचे दर रुग्णांना स्पष्टपणे दिसतील अशा ठळक फलकावर प्रदर्शित करावेत, अशी मागणी मनसेचे राहाता तालुकाप्रमुख गणेश जाधव यांनी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाकडे निवेदनाद्वारे केली आहे.काही दवाखान्यांमध्ये बारीक अक्षरांत दरपत्रक लावलेले असते, तर काही ठिकाणी डॉक्टर सांगतील तीच फी आकारली जाते. याबाबत विचारणा केल्यास काही डॉक्टर नाराजी व्यक्त करतात किंवा चिडचिड करतात, असा अनुभव अनेक रुग्णांना आल्याचा दावा जाधव यांनी केला आहे.वैद्यकीय क्षेत्रातील काही अनिष्ट प्रवृत्तीमुळे या क्षेत्रावरील विश्वास कमी होत चालल्याचेही त्यांनी म्हटले आहे. किरकोळ आजार असतानाही काही डॉक्टर महागडी औषधे लिहून देतात तसेच स्वतःच्या दवाखान्याशी संबंधित मेडिकल स्टोअरमधूनच औषधे घेण्याचा आग्रह धरतात, अशी तक्रार त्यांनी केली.रुग्णांना समजेल अशा भाषेत किंवा टाइप केलेले प्रिस्क्रिप्शन देण्याचे नियम असताना काही डॉक्टर केवळ मेडिकल स्टोअर चालकांनाच समजेल अशा अक्षरांत औषधपत्र लिहितात. ही बाब रुग्णांचा छळ करणारी असल्याचे जाधव यांनी नमूद केले.अलिकडे श्रीरामपूर व राहाता तालुक्यातील काही नामवंत रुग्णालयांमध्ये ऑनलाइन पेमेंटऐवजी रोख रकमेचा आग्रह धरला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

# उद्योजक किशोर नवले यांच्या पद्माटेक इंडस्ट्रीजला ‘महाराष्ट्र उद्योग रत्न’ पुरस्कार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील भेंडा खुर्द येथील भूमिपुत्र तथा उद्योजक इंजिनिअर किशोर सोपानराव नवले यांच्या पुणे येथील पद्माटेक इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ‘महाराष्ट्र उद्योग रत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रिसील मार्केट रिसर्च अँड फिल्म कंपनीतर्फे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि. १ मे रोजी नाशिक येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते पद्माटेकच्या अध्यक्षा वर्षा नवले व विपणन संचालक किशोर नवले यांनी पुरस्कार स्वीकारला.

रोजगार निर्मिती, उद्योगसेवा तसेच मोठ्या प्रमाणावर निर्यात करून भारतासाठी परकीय चलन मिळवून दिल्याबद्दल कंपनीचा गौरव करण्यात आला. पद्माटेक इंडस्ट्रीज ही कंपनी गेल्या १९ वर्षांपासून मशिनरी क्षेत्रात कार्यरत आहे.

फार्मासिटिकल तसेच केमिकल कंपन्यांसाठी गुणवत्तापूर्ण मशिनरी निर्मितीबद्दल सन २०२२ मध्ये केंद्र शासनाचा ‘बेस्ट क्वालिटी प्रॉडक्ट’ हा सर्वोच्च पुरस्कारही कंपनीला प्राप्त झाला आहे.

मेकॅनिकल इंजिनिअर असलेल्या किशोर नवले यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीचा अनुभव घेत व्यवसायात पदार्पण केले. भोसरी येथे पहिला प्रकल्प उभारल्यानंतर नगर जिल्ह्यातील पांढरीपूल एमआयडीसीमध्ये दुसरा प्रकल्प सुरू केला. देशभरातील विविध राज्यांतील नामवंत उद्योगांसाठी अन्न प्रक्रिया, केमिकल व फार्मासिटिकल क्षेत्रातील मशिनरी निर्मितीचे काम कंपनी करत आहे.

या सन्मानाबद्दल बोलताना किशोर नवले म्हणाले, हा पुरस्कार अध्यक्षा वर्षा नवले, कार्यसंचालन संचालक सोमनाथ नवले यांचे नेतृत्व तसेच कंपनीच्या प्रत्येक कर्मचारी व कामगारांच्या परिश्रमांचे फलित आहे.

त्यांच्या निष्ठा, समर्पण आणि उत्कृष्टतेप्रती असलेल्या कटिबद्धतेमुळेच हे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

## श्रीरामपूर तालुका माध्यमिक शिक्षक संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुका माध्यमिक शिक्षक संघाची सभा दि. १ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता माध्यमिक शिक्षक सोसायटी सभागृह, श्रीरामपूर येथे विद्यमान अध्यक्ष फारुक सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी सन २०२६ ते २०२८ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.



सभेत अध्यक्षपदी कुंडलिक म्हाळूदास शिरोळे, सचिवपदी बाबासाहेब लक्ष्मण नगरे, उपाध्यक्षपदी बाबासाहेब लालझरे व विजय भगत, सहसचिवपदी संदीप बोरूडे, लॉरेन्स अँथोनी बलराज व फारुकनवाब सुभानभाई इनामदार, तर खजिनदारपदी दत्तात्रय वाघमोडे यांची निवड करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे उपाध्यक्ष चांगदेव कडू, श्रीरामपूर टीडीएफचे अध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे विद्यमान संचालक प्रशांत होन, जिल्हा उपाध्यक्ष प्रसाद शिंदे, संचालक साहेबराव रक्टे तसेच कलाध्यापक संघाचे पदाधिकारी बाळासाहेब वमने, शंकरराव शेलमकर, अरुण थोरात, मुकुंद कालंगडे, विलास कुलकर्णी, दादा तुपे, अरुण शिंदे, कैलास हाके, नितिन रायपल्ली, संजय कंगले, काकासाहेब चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. सभेमध्ये शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर, अडचणींवर तसेच शैक्षणिक क्षेत्रातील समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटना कायम तत्पर राहील व प्रत्येक शिक्षकाच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या शिष्टमंडळाचा ऑस्ट्रेलिया दौरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** महाराष्ट्रातील ऊस शेती आणि साखर उद्योग अधिक आधुनिक, संशोधनाधारित व जागतिक स्पर्धात्मक बनविण्याच्या उद्देशाने पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्हीएसआय) च्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने ऑस्ट्रेलियातील विविध जागतिक दर्जाच्या ऊस संशोधन संस्था, प्रगत प्रयोगशाळा तसेच आधुनिक साखर कारखान्यांचा अभ्यास दौरा केला. या दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील ऊस उत्पादन आणि साखर उद्योगासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या शिष्टमंडळामध्ये माजी मंत्री तथा व्हीएसआय नियामक मंडळ सदस्य बाळासाहेब थोरात, माजी मंत्री राजेश टोपे, पीक उत्पादन व संरक्षण विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग, ऊस प्रजनन विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुशीर कपिल आणि रेणूजीवशास्त्र व जनुकीय अभियांत्रिकी विभागाचे डॉ. अशोक जगताप यांचा समावेश होता.दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने ‘शुगर रिसर्च ऑस्ट्रेलिया’च्या अत्याधुनिक ‘आयरिस’ प्रयोगशाळेला भेट दिली. या प्रयोगशाळेमध्ये ऊस जीनोमिक्स, रोग निदान, टिश्यू कल्चर, साइटोजेनेटिक्स, कीड व रोग व्यवस्थापन तसेच मृदा व पोषण विश्लेषणासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. ऊस उद्योगासाठी वेगवान व अचूक संशोधन येथे केले जात असल्याची माहिती शिष्टमंडळाने घेतली.

तसेच ‘द युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन्सलँड’ येथील स्पीड ब्रीडिंग सुविधेची पाहणी करण्यात आली. नियंत्रित तापमान, कृत्रिम प्रकाश व्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कमी कालावधीत नवीन ऊस व इतर पिकांच्या जाती विकसित करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यात आला. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अधिक उत्पादनक्षम आणि प्रतिकारक्षम वाण विकसित करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.शिष्टमंडळाने फोटोपीरियड सुविधा व हायड्रोपोनिक्स संशोधन केंद्रालाही भेट दिली. कृत्रिम प्रकाश नियंत्रणाद्वारे ऊसात फुलोरा प्रेरित करण्याच्या आधुनिक पद्धतींचा अभ्यास करण्यात आला. विविध देशांतील ऊस प्रजनन कार्यक्रमांसाठी या केंद्राचे विशेष महत्त्व असल्याचे सांगण्यात आले.याशिवाय ‘ऑस्ट्रेलियन प्लांट फिनॉमिक्स नेटवर्क’च्या अत्याधुनिक सुविधेची पाहणी करण्यात आली. ड्रोन, सेन्सर, इमेजिंग प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्सच्या सहाय्याने पिकांची वाढ, दुष्काळ सहनशीलता व उत्पादन क्षमता यांचे अचूक विश्लेषण कसे केले जाते, याची माहिती घेण्यात आली.आधुनिक साखर कारखान्यांना भेट देत ऊस गाळप, ऊर्जा निर्मिती, बॅगॅसचा पुनर्वापर, स्वयंचलित मिल व्यवस्थापन आणि शाश्वत साखर उत्पादन पद्धतींचा सखोल अभ्यास करण्यात आला.

## शेळीपालनातून स्वावलंबनाकडे वाटचाल करा : देशमुख

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** शेतीपूरक व्यवसायामध्ये यश मिळवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, योग्य प्रशिक्षण आणि कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले. कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर आणि वॉटर संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शेळीपालन प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.कृषी उद्योजकता अभियानांतर्गत युवक आणि शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याचे काम कृषी विज्ञान केंद्रामार्फत सातत्याने सुरू असून, शेळीपालनामध्ये मोठ्या प्रमाणात करिअर आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध असल्याचे देशमुख यांनी सांगितले.प्रशिक्षणामध्ये पशुविज्ञान विभागाचे डॉ. विठ्ठल विखे यांनी शेळीपालनातील आधुनिक तंत्रज्ञान, शेळ्यांच्या जातींची निवड, खाद्य व्यवस्थापन, लसीकरण, रोग नियंत्रण तसेच बाजारपेठ व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पशुधन विकास अधिकारी डॉ. करण खर्डे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना, त्यांचे निकष तसेच सिरोही आणि बीटल जातींची माहिती दिली.



यावेळी शेळी शेड बांधणी, संतुलित आहार, कृत्रिम रेतन, करडू संगोपन, विमा योजना तसेच विभागांतर्गत विविध योजनांविषयी माहिती देण्यात आली. खंडाळा येथील प्रगतिशील शेळी उत्पादक चंद्रकांत मुंढे यांनी शेळीपालन व्यवसायातील बारकावे, जातींची निवड, संगोपन, अतितापमानातील काळजी आणि घरच्या घरी प्रथमोपचार याबाबत अनुभव कथन केले.डॉ. प्रियंका खर्डे यांनी शेळीपालन व्यवसायातील गट संघटन, एकत्रित मार्केटिंग आणि संवाद कौशल्य यावर मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी परिसरातील विविध गावांमधून १०५ शेतकरी, महिला आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. प्रियंका खर्डे यांनी केले.

## गळनिंब येथील ग्रामसुरक्षा यंत्रणा तात्काळ सुरू करा : शेरमाळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** – तालुक्यातील उक्कलगाव, गळनिंब, यासह कुरणपूर, फत्याबाद, मांडवे, कडीत काही दिवसापासून वाढत्या चोरी, दरोडा या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत.यामुळे पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने पूर्ण रक्कम भरून देखील जिल्हा पोलीस प्रशासनाने बंद पडलेल्या ग्रामसुरक्षा यंत्रणा तात्काळ सुरू करावी,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संदिप शेरमाळे यांनी केली.

या प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात शेरमाळे म्हटले आहे की, मागील काळात ही ग्रामसुरक्षा यंत्रणा सुरू करण्यात आली होती.मात्र शासनाकडे आवश्यक रक्कम भरून देखील सध्या यंत्रणा बंद पडली आहेत.गेल्या पंधरा दिवसांपासून गळनिंब व पंचक्रोशीत केबल व मोटार चोरीचे प्रमाण वाढले आहे.तिळापूर (ता. राहुरी) येथील घटना ताजी असताना चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.ज्यावेळी यंत्रणा कार्यरत होती,त्यावेळी गळनिंब गावामध्ये दोन दुचाकीचा शोध तात्काळ लागला होता.ड्रोनच प्रकरण सुरू असताना नागरिक एकाचवेळी जमा व्हायचे.यंत्रणा पुन्हा कार्यान्वित झाल्यास गुन्हेगारांचा शोध घेण्यास मदत होईल, तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल,असे त्यांनी नमूद केले.जिल्हा पोलीस प्रशासनाने पुन्हा यंत्रणा अद्ययावत करून अधिक मोबाईल क्रमांक यामध्ये समाविष्ट केलेले असून, ग्राम सुरक्षा यंत्रणा ग्रामस्थांना समजण्याच्या आत बंद पडली असून, त्वरित कार्यान्वित करून आपत्कालीन संदेश प्रसारित करण्यास सहकार्य करावे अशी मागणी केली आहे.

# गांधी पुतळा परिसरातील रस्त्यांच्या कामाला वेग; वाहतुकीत बदल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील गांधी पुतळा परिसर तसेच श्रीरामपूर पोलीस स्टेशनसमोरील मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाच्या कामाला वेग आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे अखेर प्रशासनाने पुढाकार घेत काम हाती घेतल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गांधी पुतळा परिसर, मुख्य चौक आणि पोलीस स्टेशनसमोरील रस्त्यावर सध्या खड्डे बुजवून नवीन डांबरी थर टाकण्याचे काम सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस असल्याची माहिती मिळाली आहे.दरम्यान, काम सुरू असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही प्रमाणात संथ गतीने सुरू आहे. पोलीस प्रशासनाच्या वतीने ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावून सुरक्षिततेची काळजी घेतली जात आहे. वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा तसेच या परिसरातून जाताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हा रस्ता शहरातील अत्यंत वर्दळीचा असल्याने येथे दिवसभर वाहनांची मोठी रहदारी असते. रस्त्याचे काम सुरू झाल्याने स्थानिक व्यापारी, नागरिक आणि वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. काम दर्जेदार व्हावे आणि लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पायरेन्स आयबीएमएच्या विद्यार्थ्यांचा गुजरात दौरा यशस्वी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून आणि प्रक्षेत्र भेटींमधून शिक्षण देण्याच्या उद्देशाने पायरेन्स, लोणी येथील आय.बी.एम.ए.च्या विद्यार्थ्यांचा गुजरात अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पार पडला. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अनुभवांची समृद्ध जोड मिळाली असून नव्या करिअर संधींचे दालनही खुले झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे आणि पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक शिक्षणावर विशेष भर दिला जात आहे. संस्थेचा विद्यार्थी सर्वगुणसंपन्न व कौशल्याधारित घडावा, यासाठी संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत.



पायरेन्स इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशनच्या एमबीए व एमसीए विभागातील ४५ विद्यार्थ्यांनी अहमदाबादआनंदएकता नगर येथे पाच दिवसीय औद्योगिक व शैक्षणिक सहलीत सहभाग घेतला. प्रा. सौरभ दिघे व प्रा. ऋतुजा कोतकर यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली, अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी दिली.या सहलीचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज, आधुनिक व्यवस्थापन पद्धती तसेच देशाच्या ऐतिहासिक व शैक्षणिक वारशाची ओळख करून देणे हा होता. शैक्षणिक अभ्यासासोबत प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात लक्षणीय भर पडली.अहमदाबाद येथे विद्यार्थ्यांनी आयआयएम अहमदाबादच्या आर्काइव्हसला भेट देऊन केस स्टडी पद्धती, शैक्षणिक परंपरा आणि जागतिक दर्जाच्या शिक्षणाविषयी माहिती घेतली. या भेटीमुळे उच्च शिक्षणासाठी नवी दिशा मिळाली.यानंतर साबरमती आश्रमाला भेट देत विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या विचारांचा व जीवनमूल्यांचा परिचय करून घेतला. शांत वातावरणात त्यांनी प्रेरणादायी अनुभव घेतला. सायंकाळी कांकरीया तलाव येथे विरंगुळ्याचा आनंद लुटला.आनंद येथे अमूल डेअरी व चॉकलेट उत्पादन प्रकल्पाला भेट देऊन विद्यार्थ्यांनी दूध प्रक्रिया, पॅकेजिंग, गुणवत्ता नियंत्रण व सप्लाय चेन व्यवस्थापनाची प्रत्यक्ष माहिती घेतली. या अनुभवामुळे उत्पादन व्यवस्थापनाची सखोल समज विकसित झाली.एकता नगर येथे मुक्कामादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग घेतला. कुबेर मंदिरात दर्शन घेतल्यानंतर बोटिंगचा आनंद लुटला. तसेच स्टॅच्यू ऑफ युनिटीला भेट देऊन सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाची माहिती जाणून घेतली. कॅक्टस व बटरफ्लाय गार्डनच्या भेटीतून पर्यावरण संवर्धनाची जाणीव अधिक दृढ झाली.ही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरली. औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अनुभवांचा समतोल साधत पायरेन्स संस्थेने एक आदर्श उपक्रम राबविल्याचे अधोरेखित झाला.


## जाहीर निविदा

### ग्रामपंचायत कान्हेगाव, ता. श्रीरामपूर जि .अहिल्यानगर

ग्रामपंचायत कान्हेगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२६/२७ साठी नोंदणीकृत, ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा रक्कम | कामाचा कालावधी | निविदा फॉर्म फी | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जनसुविधा विशेष अनुदान योजना २०२५-२६ | मौजे कान्हेगाव, ता. श्रीरामपूर येथील स्मशानभूमी विकास करणे | १० लक्ष | ८०८६८२ | ६ महिने | ६८० | सु.बे |

टीप : १. उपरोक्त कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असुन कोऱ्या निविदा संच दि.०८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दि. १४/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्षाने भरणा करून उपलब्ध आहे. २. परीपुर्ण रित्या भरलेल्या निविदा संच ग्रामपंचायत कार्यालय दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दि. १४/०५/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वा तत्पूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सादर करता येतील. ३. निविदा दि. १५/०५/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. ४. निविदा संदर्भात सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५.काम सुरु करणे पूर्वी कामाचा व कामावरील मजुरांचा शासकीय विमा उतरविणे ठेकेदारास बंधनकारक आहे. ६. निविदा अटी व शर्तींमध्ये बदल करणे प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा निम्म स्वाक्षरीत राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**कान्हेगाव, ग्रामपंचायत ता. श्रीरामपूर**



## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एसआर/१०६/२०२६
नेवासा दिनांक. २७/०४/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-संजय मारुती बर्वे रा. दिघी ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शिवन्या अनिल शिंदे रा. दिघी यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे. अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-शिवन्या अनिल शिंदे, गावाचे नाव-दिघी, जन्म दिनांक-३०/१०/२०२० करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### पुढील आठवड्यापासून ऊस उत्पादकांचे पैसे देणार

समूहाचे सुमारे ६०० कोटी रुपये येणे बाकी असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आर्थिक अडचणीमुळे ऊस उत्पादक शेतकरी, कामगार आणि वाहतूकदारांचे पैसे थकले असल्याचे उद्योग समूहाने मान्य केले आहे. ओंकार उद्योग समूहामार्फत राज्यातील १७ साखर कारखाने चालवले जात असून यावर्षीच्या गळीत हंगामात जवळपास एक कोटी टन ऊस गाळप करण्यात येणार असल्याचेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे. राज्यातील १८ हजार कामगार, लाखो वाहतूकदार आणि सुमारे आठ लाख शेतकरी या उद्योग समूहाशी जोडलेले असल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, सोशल मीडियाच्या माध्यम ातून उद्योग समूह आणि बोत्रे पाटील यांची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असल्याचा आरोप करत अशा व्यक्तींविरोधात राज्यभरात विविध ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आल्याचेही प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच संबंधितांवर अब्रुनुकसानीचे दावे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती उद्योग समूहाच्या वतीने देण्यात आली आहे. प्रत्यक्ष देयक वितरणाकडे लक्ष- ओंकार शुगर्सने शेतकऱ्यांचे देणे देण्याची घोषणा केली असली तरी मात्र, शेतकऱ्यांची नेमकी किती एफआरपी बाकी आहे आणि ती पूर्णपणे कधी अदा केली जाणार? याबाबत पत्रकात स्पष्ट वेळापत्रक देण्यात आलेले नसल्याने शेतकरी आता प्रत्यक्ष देयक वितरणाकडे लक्ष ठेवून आहेत.

### राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन घोटाळ्यात

वापरून बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या बनावट आदेशांमुळे शासनाची तब्बल ७३ कोटी ४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. राष्ट्रीय म हामार्ग अधिनियमानुसार वाढीव मोबदला मिळवण्यासाठी खातेदार जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करतात. मात्र, या प्रक्रियेचा गैरफायदा घेत बनावट कागदपत्रांच्या आधारे रकमेचे मंजुरी आदेश काढण्यात आल्याचे उघड झाले आहे. बदलीनंतरही बनावट आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ रोजी बदली झाल्यानंतरही त्यांच्या कार्यकाळातील मागील तारखा वापरून आदेश जारी करण्यात आल्याचा आरोप आहे. या बनावट आदेशांद्वारे १५४ प्रकरणांमध्ये जुन्या तारखा व बनावट स्वाक्षऱ्यांच्या आधारे तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. यापैकी अंदाजे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरितही करण्यात आल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, या आदेशांबाबत कोणतेही अधिकृत रजिस्टर, नोंदवही किंवा प्रशासकीय नोंदी भूसंपादन समन्वय कार्यालयात उपलब्ध नसल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. एसआयटीचा तपास वेगात या संपूर्ण प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत सुरू असून आणखी काही अधिकारी व संबंधितांवर कारवाईची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्याला अटक झाल्याने राज्यातील महसूल विभागात चर्चे ला उधाण आले आहे. शेतकऱ्यांच्या नावावर कोट्यवधींचा खेळ शेतकऱ्यांच्या नावावर वाढीव मोबदल्याच्या नावाखाली कोट्यवधींची अफरातफर करण्यात आल्याचा आरोप असल्याने या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे. तपासातून आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे

### मंत्री सामंत यांच्याकडून शिवसेनेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

संघटनेचे मोठे नुकसान होत आहे. अशी परिस्थिती कायम राहिली तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये त्याचे गंभीर परिणाम दिसतील, असा इशारा त्यांनी दिला. शिवसेना वाढली पाहिजे हा एकमेव विचार डोळ्यासमोर ठेवून काम करा. कोणत्याही गटबाजीला यापुढे थारा दिला जाणार नाही. मला कोणाचे घेणे-देणे नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगत सामंत यांनी संघटनेत शिस्त आणि एकजूट आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. यावेळी सामंत यांनी माजी आमदार भानुदास मुरकुटे यांना उद्देशून विशेष आवाहन केले. मुरकुटे साहेब, तुम्ही श्रीरामपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांना एकदा रत्नागिरीला घेऊन या. आम्ही संघटनात्मक नियोजन कसे करतो ते दाखवतो, असे म्हणत त्यांनी कार्यकर्ता प्रशिक्षणासाठी रत्नागिरी भेटीचे निमंत्रण दिले.

बैठकीत बोलताना सामंत यांनी पश्चिम बंगालमधील भाजपच्या संघटनात्मक यशाचे उदाहरण देत कार्यकर्त्यांच्या ताकदीवर सत्ता काबीज करता येते, असे सांगितले. ममता बॅनर्जी यांच्या सरकारविरोधात भाजपचे सुरुवातीला फक्त दोन आमदार होते. मात्र कार्यकर्त्यांच्या जोरावर त्यांनी सत्ता मिळवली. शिवसेनाही कार्यकर्त्यांच्या ताकदीवर नंबर वन पक्ष बनू शकतो, असे ते म्हणाले. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील शिवसेनेच्या यशस्वी संघटनात्मक म ॉडेलचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, रत्नागिरीत १५ जिल्हा परिषद सदस्य, ९ पंचायत समिती सदस्य आणि अनेक नगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात आहेत. हे सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे शक्य झाले. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही शिवसेना हा तळागाळातील कार्यकर्त्यांच्या जोरावर चालणारा पक्ष असल्याचे म्हटल्याचा उल्लेख सामंत यांनी केला. बैठकीच्या शेवटी वादावादीने संघटना कधीच मोठी होत नाही. कामासाठी निधी कमी पडू देणार नाही, पण कार्यकर्त्यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे, असा संदेश देत सामंत यांनी पदाधिकाऱ्यांना आत्मचिंतन करण्याचा सल्ला दिला.

# भूमिगत गटार योजनेला प्रारंभ; श्रीरामपूरकरांना दिलासा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीरामपूर, शहरातील प्रमुख व अत्यंत वर्दळीच्या राधिका हॉटेल परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची प्रतीक्षा अखेर संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. या भागात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या भूमिगत गटार योजनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने स्थानिक नागरिक, व्यापारी व वाहनधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. राधिका हॉटेल परिसर हा शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने येथे दिवसभर मोठी वर्दळ असते. मात्र, योग्य सांडपाणी व्यवस्थेअभावी या भागात दुर्गंधी, साचलेले पाणी तसेच पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अनेकदा नागरिकांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर अखेर या योजनेच्या कामास गती मिळाली आहे. दरम्यान, कामामुळे या मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला असून सध्या मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. रस्ता खोदकामामुळे अरुंद झाल्याने दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कडेला मातीचे ढिगारे व सिमेंट पाईप्स ठेवण्यात आल्याने




पादचाऱ्यांचीही गैरसोय होत आहे. कामाच्या ठिकाणी पुरेशा सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. खोदलेल्या खड्ड्यांभोवती बॅरिकेड्स, चेतावणी फलक किंवा प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. काम दर्जेदार व्हावे, लवकर पूर्ण व्हावे आणि पावसाळ्यापूर्वी परिसरातील नागरिकांना दिलासा मिळावा. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांनी पर्यायी व्यवस्था करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. भूमिगत गटार योजनेमुळे परिसरातील दीर्घकालीन समस्या मार्गी लागण्याची आशा व्यक्त होत आहे.

# महीलेचा दगडाने ठेचून खून, परिसरात खळबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील गवळीशिवरा-आरापुर शिवारात ४६ वर्षीय महिलेचा अत्यंत निर्घृणपणे खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून दगडाने चेहरा ठेचलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सुमन कडू काकडे (वय ४६, रा. वडाळी, ह.मु. गवळी धानोरा ता. गंगापूर) असे मृत महिलेचे नाव आहे. मृत सुमन काकडे या माहेरी गवळी धानोरा येथे भावाकडे राहत होत्या. सोमवारी केवायसी करण्यासाठी लासूर स्टेशनला जाते असे सांगून त्या आवश्यक कागदपत्रे घेऊन घराबाहेर पडल्या होत्या. मात्र रात्री उशिरापर्यंत त्या घरी परतल्या नाहीत. त्यामुळे नातेवाईकांनी त्यांचा सर्वत्र शोध सुरू केला होता. दरम्यान, मंगळवारी दुपारी गवळीशिवरा शिवारातील रस्त्यालगत गट क्रमांक ८९ मध्ये एका शेतकऱ्याला नांगरणी करताना महिलेचा रक्ताने माखलेला मृतदेह दिसून आला. मृत महिलेचा चेहरा मोठ्या दगडाने ठेचण्यात आल्याने ओळख पटविणे कठीण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटील बद्रीनाथ केरे यांनी शिल्लेगाव पोलिसांना कळविले. माहिती मिळताच शिल्लेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. अप्पर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश पालवे तसेच पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.



पोलिसांनी गायब झालेल्या महिलांच्या यादीवरून तसेच इतर शारीरिक लक्षणांच्या आधारे मृत महिलेची ओळख पटविली. या प्रकरणी नातेवाईकांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. शवविच्छेदनानंतर बुधवारी रात्री महिलेवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.या निर्घृण हत्येमुळे गंगापूर तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिलेचा एवढ्या क्रूरपणे खून कोणी आणि का केला? याबाबत नागरिकांमध्ये तीव्र चर्चा सुरू आहे.

# बालसंगोपन योजनेचे अर्ज आता शाळांमध्येच भरणार; श्रीरामपुरात आज महसूल शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :**एकल माता असलेल्या विद्यार्थ्यांना महिला व बालविकास विभागाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आता शाळांमध्येच विद्यार्थ्यांचे अर्ज भरून घेतले जाणार आहेत. ही माहिती श्रीरामपूर तालुका मिशन वात्सल्य शासकीय समितीच्या बैठकीत देण्यात आली.

महसूल अधिकारी अभया राजवळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अशासकीय सदस्य मिलिंदकुमार साळवे यांनी याबाबत माहिती दिली. समितीच्या सदस्य सचिव तथा प्रभारी बालविकास प्रकल्पाधिकारी शोभा शिंदे यांनी प्रारंभी मागील बैठकीचे इतिवृत्त वाचन केले.

यावेळी अशासकीय सदस्य बाळासाहेब जपे, अर्जुन राऊत, तालुका संरक्षण अधिकारी दीपाली भिसे, नगरपालिकेचे समुदाय संघटक हरीष पैठणे, गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी इरफान शेख, पंचायत समितीच्या 'उमेद' विभागाचे अशोक रामकरवाल उपस्थित होते. गटविकास अधिकारी, पोलीस, आरोग्य, तालुका विधी सेवा प्राधिकरण व कृषी विभागाचे अधिकारी गैरहजर होते. प्रमुख अधिकारी सलग तीन बैठकींपासून गैरहजर राहत असल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.


शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शाळांमध्ये एकल माता असलेल्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र नोंदवही ठेवण्याचे आदेश दिले असून, शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव व अर्ज शाळा स्तरावरूनच भरून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार तालुक्यातील शाळांनी तातडीने कार्यवाही करावी, असे साळवे यांनी सांगितले.

शिधापत्रिकेपासून वंचित असलेल्या एकल महिलांना लाभ देण्याबाबत बाळासाहेब जपे व अर्जुन राऊत यांनी लक्ष वेधले. यावर सभाध्यक्ष राजवळ यांनी पुरवठा विभागाचे अधिकारी एस. ए. पुजारी यांना आवश्यक सूचना दिल्या. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी केलेल्या सर्वेक्षणात ८८४ एकल महिलांच्या शिधापत्रिकेबाबत अडचणी समोर आल्याची माहिती शोभा शिंदे यांनी दिली.

दरम्यान, तहसील कार्यालयाच्या वतीने विविध शासकीय योजना, दाखले व समस्यांच्या निवारणासाठी दि. ८ मे रोजी उत्सव मंगल कार्यालय येथे व दि. १५ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा एकल महिलांसह सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार मिलिंदकुमार वाघ व अभया राजवळ यांनी केले.

## निधन वार्ता

### नंदकुमार संचेती



**वैजापूर,** येथील सराफा व्यापारी नंदकुमार रिखबचंद संचेती (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. येथील अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी दहा वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात्य पत्नी, आई व मुलगा अल्पेश असा परिवार आहे.

### राजेंद्र कल्हापुरे



**राहुरी :** तालुक्यातील देसवंडी येथील राजेंद्र मधुकर कल्हापुरे (वय ५४ वर्षे) यांचे नुकतेच तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, जावई असा मोठा परिवार असून ते तंटामुक्तीचे अध्यक्ष होते. तसेच देसवंडी येथील कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अरुण वामन कल्हापुरे यांचे पुतणे व देसवंडीचे लोकनियुक्त सरपंच नितीन कल्हापुरे यांचे मोठे बंधू होते.

### किसनराव जाधव



**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील भावीनिमगाव येथील जेष्ठ वारकरी हभप किसनराव केशवराव जाधव (वय ७९) यांचे रविवार दि.३ रोजी निधन झाले. ते जगदंबा माता भजनी मंडळाचे आदर्श गायक होते. त्यांच्या मागे पत्नी, तीन विवाहित मुले, दोन विवाहित मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी एकनाथ, शिवाजी आणि नवनाथ जाधव यांचे ते वडील तर पाथर्डीचे माजी नगरसेवक रमेश गोरे यांचे ते मामा होत.

# बदली झाल्याने वकील संघाच्या वतीने न्यायाधीशांना निरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** वैजापूर जिल्हा न्यायालय येथे कार्यरत असलेल्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश (१) एस के उपाध्याय मॅडम यांची शासकीय नियत वयोमानानुसार सेवा बदली मुंबई येथील न्यायालयात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश म्हणून झाली असून तसेच दिवाणी न्यायाधीश क स्तर श्रिमती एस. के. खान मॅडम यांची मालेगाव न्यायालय येथे बदली झाल्याने त्यांना वैजापूर जिल्हा वकील तसेच वकील संघ ग्राहक सहकारी सोसायटी त्याच प्रमाणे गंगापूर जिल्हा वकील संघाचे वतीने निरोप समारंभ देण्यात आला.

वैजापूर जिल्हा न्यायाधीश म्हणून कामाची दखल म्हणून दोन वेळेस जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश (१) एस. के. उपाध्याय मॅडम यांना बढती मिळाली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दुसरे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एल. जी. पाच्चे , दिवाणी न्यायाधीश व स्तर डि .एस .पिसाळ,प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एन .एस. काळे, न्यायाधीश श्रीमती एम .ए .बेंद्रे मॅडम यांचे प्रमुख



उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात घेण्यात आला.जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड मजहर बेग ,सचीव अँड तुषार थोट, सोसायटीचे चेअरमन अँड सोपान पवार, ज्येष्ठ सदस्य अँड प्रमोद दादा जगताप ,यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन व पुढील वाटचालीसाठी उत्तरोत्तर प्रगती करिता शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी जिल्हा सरकारी वकील कृष्णा गंडे ,अँड आर. डी .थोट .सरकारी वकील अँड संजय बारसे ,अँड अंभोरे, अँड राजेंद्र हरिदास, अँड एस .एस .ठोळे, अँड अशोक चव्हाण, गंगापूर जिल्हा वकील संघाचे वतीने अँड कृष्णा ठोंबरे ,अँड ए .एम .बागुल, अँड रामकृष्ण बोडखे, अँड राजु शिंदे, अँड अनिल रोठे, अँड महेश कदम, अँड संतोष जेजुरकर, अँड प्रदीप बत्तासे ,अँड एच .एम .पठाण ,अँड आर .डी .सिरसाठ ,अँड राजपूत ,अँड व्हि .जी .वाघ, अँड किरण त्रिभुवन, अँड नितीन बोराडे, अँड निखिल हरिदास, अँड देवदत्त पवार ,अँड गोरे ,अँड श्रेणिक कोठारी, अँड इम्रान, अँड आकाश ठोळे, अँड बाबासाहेब अढागळे, अँड कुणाल हरिदास, अँड पोंदे, अँड राहुल धनाड, अँड कटारे, अँड यासेर अली, अँड जावेद बेग ,अँड कुलदीप बागुल ,अँड कुणाल, बागुल ,अँड डी. टी. डगळे ,यांनी सुत्रसंचालन तर आभार अँड तुषार थोट यांनी मानले यावेळी मोठ्या संख्येने महिला , पुरुष वकीलांची उपस्थिती होती.

# देवळाली प्रवरात ढोक महाराजांच्या श्रीराम कथेला भाविकांचा उदंड प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील बाजार तळावर श्री साई प्रतिष्ठान व शहरवासीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असून संपूर्ण परिसर सध्या भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला आहे.

रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या मधुर, ओघवत्या आणि प्रभावी वाणीतून सादर होत असलेली ही कथा भाविकांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरत आहे. कथेच्या तिसऱ्या दिवशी ढोक महाराज यांनी 'सीता स्वयंवर' या अत्यंत महत्त्वपूर्ण प्रसंगावर सखोल व हृदयस्पर्शी निरूपण केले. जनकनंदिनी सीतेसाठी आयोजित स्वयंवर, भगवान श्रीरामांनी उचललेले शिवधनुष्य आणि त्यानंतर झालेला विवाह सोहळा या प्रसंगांचे त्यांनी केलेले जिवंत वर्णन ऐकताना उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या निरूपणातून धर्म, कर्तव्य आणि आदर्श जीवनमूल्यांचा संदेश त्यांनी प्रभावीपणे दिला.



या कथेच्या आयोजनासाठी उभारण्यात आलेला भव्य आणि आकर्षक सेटअप, भाविकांच्या सोयीचा विचार करून महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक एलईडी स्क्रीनची व्यवस्था केल्यामुळे दूरवर बसलेल्या श्रोत्यांनाही कथेचा प्रत्येक क्षण स्पष्टपणे अनुभवता येत आहे. उत्तम ध्वनीप्रणालीमुळे महाराजांच्या वाणीतील गोडवा आणि संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचत आहे. दररोज सायंकाळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहून कथेचा लाभ घेत आहेत. परिसरातील तसेच आसपासच्या गावांमधूनही भक्त मोठ्या उत्साहाने या सोहळ्यात सहभागी होत आहेत. साई प्रतिष्ठानच्या सदस्यांकडून शिस्तबद्ध नियोजन करण्यात येत असून कार्यक्रम सुरळीत पार पडत आहे. एकंदरीतच श्रीराम कथेमुळे देवळाली प्रवरा येथे धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून हा सोहळा भाविकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरण अजिंक्यपदाकडे खो-खोमध्ये (महिला) विजेतेपद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणने सलग दुसऱ्या दिवशीही दबदबा ठेवत अजिंक्यपदाकडे वाटचाल सुरु केली आहे. यामध्ये महावितरणच्या खो-खोच्या महिला संघाने विजेतेपद मिळवले आहे. तर कबड्डीमध्ये उपांत्य फेरीत तर खो-खो व बास्केटबॉलमध्ये पूर्वउपांत्य फेरीत महावितरणच्या संघाने प्रवेश केला आहे.



बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत गुरुवारी (दि. ७) खो-खोच्या महिला गटात महावितरण विरुद्ध राजस्थान असा अंतिम फेरीचा सामना झाला. यात महावितरणच्या कर्णधार भाग्यश्री फडतरे, सारिका जाधव, श्रेया जाधव, मोनिका भोसले यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये दमदार कामगिरी करीत सामन्यावरील वर्चस्व कायम ठेवले. पहिल्या डावात १२ विरुद्ध ५ गुणांची आघाडी घेत दुसऱ्या डावात महावितरण संघाने सहा मिनिटे राखून खो-खोचे राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तर राजस्थानला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

खो-खोच्या पुरुष गटामध्ये महावितरण संघाने (१५) हरियाणा संघाचा (४) ११ गुणांनी सहज पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मात्र राजस्थान (६) विरुद्ध महापारेषण (५) संघात तुल्यबळ लढत झाली व राजस्थानने एक गुणाने निसटता विजय मिळवला. आता महावितरण विरुद्ध महापारेषण आणि हरियाणा विरुद्ध राजस्थान अशी अंतिम फेरीसाठी लढत होणार आहे. भारतीय खो-खो संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह निशिकांत शिंदे, विराज कोटमकर, महेंद्र पाटील यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये सातत्य कायम ठेवले असून सर्व साखळी सामन्यांत वर्चस्व मिळवले आहे. महापारेषणचा उत्कृष्ट खेळाडू विशाल सावंत व इतर सहकाऱ्यांवर आता बलाढ्य महावितरण संघाचा पराभव करण्याचे आव्हान आहे.

कबड्डीच्या पुरुष गटामध्ये पूर्वउपांत्य फेरीत बीएसईएस राजधानी दिल्ली संघ (४९) विरुद्ध महापारेषण (३९) यांच्या अतिशय अटीतटीची लढत झाली. केवळ तीन गुणांनी महापारेषणला पराभव पत्करावा लागला. दिल्लीच्या संजीव छिकारा, हरदेव शर्मा, रवी प्रकाश व अनिल यांनी आक्रमक पवित्रा घेत महापारेषणचे शेवट्या मिनिटापर्यंत सुरु असलेले आक्रमण थोपवून धरले. यानंतर हिमाचल प्रदेश संघाने (३२) मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट संघाचा (७) सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तर महावितरण संघातील (३०) दीपक माने, अमित जाधव, नीलेश ठाकूर, अभिषेक नर, अजय शिंदे यांच्या आक्रमक पवित्र्याने तेलंगणा ट्रान्समिशन संघाचा (११) १९ गुणांनी आणि हरियाणा संघाने (४८) टाटा पॉवर मुंबई संघाचा (१७) पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला.


## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि .८ मे २०२६**

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-४ | १५८ २४८ २२० | जोड ५९-७४-१६-८०-४३ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २२८ | २-९ | १२६ ४३० ११७ | जोड २१-८९-०३-२५-९६ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| २७० २८९ २२५ | ९-५ | १४० २३० ७८० | जोड ९०-४५-१३ २६-६७ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 254 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 254 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 774 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to [redacted] | 56[redacted] 06 15[redacted] | 14[redacted] 43 67[redacted] | 23[redacted] 45 50[redacted] | 13[redacted] 77 89[redacted] | 26[redacted] 85 14[redacted] |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द • ख • ल

## आदर्श ऋषीजी आनंद बाल संस्कार शिबीरास उत्तम प्रतिसाद ७०० विद्यार्थ्यांचा सहभाग



**अहिल्यानगर** : श्री तिलोक रत्न धार्मिक परीक्षा बोर्डच्या वतीने पूज्य आदर्श ऋषिजी महाराजसाहेबांच्या मार्गदर्शनाने दरवर्षी आनंद बाल संस्कार शिबीराचे आयोजन केले जाते. या वर्षीही १ मे ते ६ मे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. सकाळचे ७ वाजले कि १० मिनीटात सगळ्या रस्त्यांनी मुलांचे घोळके आनंदधाम कडे धावू लागायचे. खूपच सुंदर असे वातावरण तयार व्हायचे. मुलांनी खूप ज्ञानी होण्यापेक्षाही असलेले ज्ञान आचरणात आणावे व त्यांचा व्यक्तीमत्व विकास व्हावा या दृष्टीने शिबीराच्या अध्ययनाची आखणी करण्यात येते. दोन महिन्यांपासून शिबीराची तयारी चालू होते. यासाठी साध्वी वृंद, आनंद संस्कार शिक्षा अभियानाच्या शिक्षिका व ब्राम्ही युवती मंच यांचा विशेष सहभाग असतो. शिबीराची वैशिष्ट्ये मुलांना धर्म व विज्ञानाची सांगड घालून जीवनाचे धडे शिकवले जातात. सकाळी प्रार्थनेने शिबीराची सुरूवात होते. त्यांना फिटनेस क्लास तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली घेतला जातो. मेडिटेशन द्वारे मुलांना रिलॅक्स करून धार्मिक अध्ययनाला सुरूवात होते. सर्व मुले सामूहिक रित्या सामायिक करून जैन धर्माची सूत्रे आत्मसात करतात. या विशेष वर्गात त्यांना जीवनाची नीती मुल्ये साध्या सोप्या भाषेत दैनंदिन जीवनातील उदाहरणांमधून शिकवली गेली. ज्यात मंत्र, आचरण, भावना, जैन धर्माचा इतिहास, मैत्री अशी जीवनावश्यक सुत्रे शिकवली गेली. जर मुलांनी चांगले विचार ठेवले तर त्यांचे वर्तन निश्चितच चांगले होते ही गोष्ट अनेक कथांमधुन मुलांच्या मनात बिंबवली गेली.

## समाजाच्या उद्धारासाठीचा कुलथे कुटुंबीयांचा दातृत्व भाव प्रेरक : देवळालीकर



**अहिल्यानगर** : आपण ज्या समाजामध्ये मोठे झालो त्याच्या उद्धारासाठी, प्रगतीसाठी पुढे आलेले लोळगे कुटुंबाच्या दातृत्वाचे दानशूर हात समाजाच्या पुढील वाटचालीस प्रेरक असल्याचे उद्गार अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर यांनी व्यक्त केले. सोलापूर येथील उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते करण धनंजय लोळगे व कुटुंबीयांनी कै. सनी धनंजय लोळगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजास दोन लाख एक हजार रुपयाची देणगी दिली. यावेळी देवळालीकर बोलत होते. याप्रसंगी उद्योजक धनंजय व सौ विजया लोळगे ,सौ पूजा लोळगे ,सामाजिक कार्यकर्ते रमेश अकलूजकर, पुरुषोत्तम शहाणे , लाड सुवर्णकार समाजाचे विश्वस्त शरद कुलथे, श्याम मुंडलिक ,गणेश डहाळे, योगेश नागरे, प्रकाश देवळालीकर ,विनोद कुलथे, सुनील देवळालीकर ,सुरेश मैड उपस्थित होते. उद्योजक करण लोळगे यांनी यावेळी बोलताना समाजाच्या सामाजिक कार्यात आपला सहयोग असावा ,वंचित व गरजू बंधू-भगिनींना प्रगतीच्या प्रवाहात येण्यासाठी लोळगे कुटुंबीयांनी हा सहयोग दिला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे सातत्यपूर्ण सहयोग कायम राहील असे प्रतिपादन केले. उपस्थित मान्यवरांचा सन्मान लाड सुवर्णकार समाजाचे वतीने करण्यात आला. यावेळी गुलाब वाफगावकर, संध्या निसळ व समाजबांधव उपस्थित होते.

# कर्जत नगरपंचायतीचे सतीश पाटील नवे गटनेते

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिली मान्यता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतीच्या गटनेते पदाबाबत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या समोर गुरुवारी सुनावणी झाली .यात पूर्वीचे गटनेते संतोष मेहेत्रे यांनी त्यांच्याकडे बहुमत असल्याचे कुठलेही अभिलेख सादर न केल्याने जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी सतीश पाटील यांचा गटनेता असल्याबाबतचा प्रस्ताव स्वीकारत त्यांची गटनेते म्हणून निवड ग्राह्य धरली. सतीश पाटील यांनी २४ एप्रिल रोजी ९ नगरसेवकांचे स्वाक्षरी असलेले गटनेते बदलाबाबतचा प्रस्ताव आज ग्राह्य धरत मान्यता देण्यात आली. यासह आमदार रोहित पवार गटाचे उषा अक्षय राऊत आणि नामदेव राऊत यांनी देखील सतीश पाटील यांची बाजू लावून धरली.

मागील महिन्यात गटनेते संतोष मेहेत्रे आणि उपगटनेते सतीश पाटील यांच्या अधिकार पदावरून वाद उफाळला होता. २० रोजी उपगटनेते पाटील यांनी कर्जतच्या नगरसेवकांची बैठक बोलावली होती. या बैठकीस गटनेते मेहेत्रे यांनी आक्षेप घेत सदरची बैठक बेकायदेशीर आणि घटनाबाह्य दाखवत जिल्हाधिकारी यांना पाटील यांचे उपगटनेते पद बरखास्त करण्याची मागणी केली होती. २४ एप्रिल रोजी भाजपाचे सात नगरसेवक आणि आमदार रोहित पवार गटाच्या दोन अशा एकूण ९ नगरसेवकांनी विद्यमान गटनेते संतोष मेहेत्रे मनमानी कारभार करीत असून कोणासही विश्वासात घेत नसल्याने त्यांचे गटनेते पद रद्द करावे. आणि नूतन गटनेते म्हणून सतीश पाटील यांची नियुक्ती करावी असा प्रस्ताव स्वाक्षरीसह जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्याकडे दाखल केला. दाखल झालेल्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी डॉ आशिया यांनी २९ एप्रिल आणि ५ मे रोजी दोन सुनावण्या पार पाडल्या. बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित केली असता संतोष मेहेत्रे अनुपस्थित राहिले. तसेच त्यांनी आपल्याकडे कर्जत नगरपंचायतीच्या गटनेते पदासाठी बहुमत असणारे कुठलेही अभिलेख सादर न केल्याने त्यांना पदापासून दूर करण्यात आले दोन नगरसेवकांनी नूतन गटनेते पदासाठी सतीश पाटील यांची नियुक्ती करण्यास समर्थन दर्शविल्याने १५ पैकी ११ नगरसेवकांच्या सहमतीने नूतन गटनेते म्हणून मान्यता दिली. याबाबत संतोष मेहेत्रे यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी संभाव्य घटनेवर टिप्पणी करण्यास नकार दिला.

### ११ लकी नंबर ठरला

सत्तांतर करताना उषा राऊत यांच्या विरोधात १५ पैकी ११ नगरसेवकांनी एकत्र येत बंड पुकारला होता. तो बंड यशस्वी ठरला आणि उषा राऊत यांना पायउतार व्हावे लागले. आज देखील गटनेता बदलासाठी ११ च नगरसेवक पुन्हा एकत्र आले आणि त्यांनी गटनेता बदलला. ११ नगरसेवक ही संख्या कर्जत नगरपंचायतीच्या प्रत्येक राजकीय घटनेत निर्णायक ठरली असून आता पुढील राजकीय दिशेत आणखी काय बदल ? घडवते हे पाहणे महत्वपूर्ण ठरणार आहे.

### आजच्या सुनावणीस चार नगरसेवक अनुपस्थित

आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ आणि काँग्रेसचे ३ अशा १५ नगरसेवकांचा गट स्थापन केला होता. गुरुवारी पार पडलेल्या सुनावणीस नामदेव राऊत, अमृत काळदाते, छाया शेलार, ज्योती शेळके, ताराबाई कुलथे, प्रतिभा भैलुमे, उषा राऊत, लंकाबाई खरात, सुवर्णा सुपेकर, मोनाली तोटे आणि उपगटनेते सतीश पाटील यांनी हजेरी लावली. तर नगराध्यक्षा रोहिणी घुले, भास्कर भैलुमे, भाऊसाहेब तोरडमल आणि गटनेते संतोष मेहेत्रे हे अनुपस्थित राहिले.



### नगराध्यक्षा रोहिणी घुले यांना पायउतार करण्याची मागणी

गुरुवारी दुपारी गटनेते संतोष मेहेत्रे यांना पदावरून दूर करताच कर्जत नगरपंचायतीच्या १३ नगरसेवकांनी नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्यावर देखील अविश्वास दाखवत त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्याकडे केली. या निवेदनावर १७ पैकी १३ नगरसेवकांच्या सह्या आहेत. यात विद्यमान नगराध्यक्षा शासनाच्या नियमानुसार काम करीत नसून मनमानी कारभार पाहत आहेत. नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नसल्याचे नमूद करीत नगराध्यक्षा पदावरून दूर करण्याची मागणी केली आहे.

# उद्यान विभागाची नियोजन बैठक संपन्न

## 'ग्रीन सिटी'साठी मनपाची जोरदार तयारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : अहिल्यानगर शहराला हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत असलेल्या 'नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी' मोहिमेची तयारी आता वेगाने सुरू झाली असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने नियोजनाला गती दिली आहे. अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत शहरात एक लाख झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या उद्यान विभागाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीस उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, ग्रीन सिटी मोहीम समिती सदस्य कैलास दिघे, हर्षल आगळे, इंजिनिअर प्रताप काळे यांच्यासह उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आयुक्त यशवंत डांगे यांनी उद्यान विभागाचा सविस्तर आढावा घेत शहरातील विविध भागांमध्ये वृक्षारोपणासाठी योग्य जागांची निवड, झाडांच्या प्रजाती, संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना आणि दीर्घकालीन देखभालीबाबत विविध सूचना दिल्या. शहरातील उद्याने, रस्त्यांच्या दुतर्फा जागा, मोकळी मैदाने आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी पर्यावरण संवर्धनाच्या गरजेवर भर देत सांगितले की, जागतिक पर्यावरण दिन आला की अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले जाते; मात्र त्यानंतर त्या झाडांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होते. केवळ फोटोसेशनसाठी झाडे लावून उपयोग नाही, तर ती जगविणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे 'ग्रीन सिटी' ही केवळ मोहिम नसून शहराच्या भविष्यासाठी सुरू केलेली लोकचळवळ आहे.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर शहर दिवसेंदिवस विकसित होत असताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे झाले आहे. वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि कमी होत चाललेली हरितक्षेत्रे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण आणि संवर्धनासाठी पुढे येणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सहभागाशिवाय ही मोहीम यशस्वी होऊ शकत नाही. शहरातील प्रत्येक प्रभाग, संस्था, सामाजिक संघटना, युवक आणि विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभागी होऊन हरित नगर घडविण्यासाठी योगदान द्यावे.

# पी.ए. इनामदार ज्युनिअर कॉलेजचा बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : मुकुंदनगर येथील यस इंडिया फाऊंडेशन संचलित पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूल ण्ड ज्युनिअर कॉलेजने इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या एचएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यावर्षीच्या बारावी विज्ञान शाखेच्या निकालात विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले. कॉलेजच्या गुणवत्ता यादीत उम्मे अम्मारा अल्ताफ शेख हिने ७६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. आफरीन फिरोजोद्दीन मुल्ला हिने ६१.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर आमेना कदीर शेख हिने ६०.१७ टक्के गुण प्राप्त करत तृतीय क्रमांकावर स्थान मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कॉलेजमध्ये गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य युनूस सलीम, डारेक्टर शब्बीर मोहंमद सी. तसेच उपप्राचार्या फरहाना शेख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेचे चेअरमन अब्दुल रहिम खोकर, व्हाईस चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी आणि अकॅडमिक चेअरमन तथा खजिनदार डॉ. खालिद शेख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीमुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कॉलेजमधील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्षभर दिलेले शैक्षणिक मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, अभ्यासातील सातत्य आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# शहरात 'इन्फोसिस' स्प्रिंगबोर्डच्या मोबाईल सायन्स लॅबचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** : विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवी दिशा देणारा 'इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड बंगळूर' व अत्याधुनिक 'मोबाईल सायन्स लॅब' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा कल्याण रोड येथील सांस्कृतिक भवन येथे शुभारंभ करण्यात आला. मिशन आपुलकी आणि जागतिक कीर्तीची आयटी कंपनी इन्फोसिस यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नगरसेवक दत्ता गाडळकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम शहरात राबविण्यात आला. हा शालेय विद्यार्थ्यांसाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचे दालन खुलं करणारा ठरत आहे.

सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाचे विज्ञान शिक्षण, कोडिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स सायबर सिक्युरिटी आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होणार असून त्यांच्या करिअरच्या नव्या संधी खुल्या होणार आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या हस्ते झाले. मिशन आपुलकीचे नोडल अधिकारी रमेश कासार म्हणाले की, इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड हा डिजिटल प्लॅटफॉर्म शहरी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक दरी मिटवण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कोडिंग, सायबर सिक्युरिटी, एआय आणि विविध कौशल्य विकासाचे पाच हजारांहून अधिक कोर्सेस पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# गुलमोहर स्पोर्टस क्लब व फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडची विजयी घोडदौड !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर सुरू असलेल्या लेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, दररोज रंगणाऱ्या चुरशीच्या सामन्यांमुळे स्पर्धेचा थरार अधिकच वाढत आहे. बुधवारी (दि.६ मे) झालेल्या दोन महत्त्वपूर्ण सामन्यांमध्ये गुलमोहर स्पोर्टस क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड या संघांनी शानदार विजय मिळवत पुढील फेरीकडे दमदार वाटचाल केली.

स्पर्धेतील गुलमोहर स्पोर्टस क्लब विरुद्ध बाटा फुटबॉल क्लब यांच्यातील सामना विशेष लक्षवेधी ठरला. सुरुवातीपासून दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केले. सामन्याच्या १३ व्या मिनिटाला बाटा फुटबॉल क्लबच्या कामरान रंगरेज याने शानदार गोल करत संघाचे खाते उघडले आणि संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलनंतर बाटा एफ.सी.चा आत्मविश्वास उंचावला होता.

मात्र पिछाडीवर पडल्यानंतर गुलमोहर स्पोर्टस क्लब ने अधिक आक्रमक आणि संयमी खेळ करत पुनरागमन केले. संघाच्या प्रणव पंडित याने १७ व्या मिनिटाला अचूक गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये चेंडूवर नियंत्रण मिळवण्यासाठी जोरदार संघर्ष पाहायला मिळाला. सामन्याच्या २७ व्या मिनिटाला आदित्य गुगळे याने अप्रतिम गोल करत गुलमोहर एस.सी.ला २-१ अशी निर्णायक आघाडी मिळवून दिली. अखेरपर्यंत ही आघाडी कायम राखण्यात संघाला यश आले आणि गुलमोहर स्पोर्टस क्लब ने शानदार विजयाची नोंद केली.

दुसऱ्या सामन्यात फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड आणि फ्रेंडस मातोश्री फुटबॉल क्लब यांच्यात अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत गोल करण्यासाठी अनेक संधी निर्माण केल्या. सामन्याच्या २६ व्या मिनिटाला भानुदास चंद याने अचूक गोल करत फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडला १-० अशी आघाडी मिळवून दिली. हा गोल सामन्यात निर्णायक ठरला. त्यानंतर फ्रेंडस मातोश्री एफ. सी. संघाने बरोबरी साधण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मात्र फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडच्या भक्कम बचावफळीपुढे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. शेवटच्या क्षणापर्यंत सामना रंगतदार अवस्थेत राहिला आणि प्रेक्षकांनी प्रत्येक क्षणाचा उत्साहाने आनंद घेतला. स्पर्धेतील वेगवान खेळ, उत्कृष्ट पासिंग, बचावातील शिस्त आणि आक्रमणातील धार यामुळे मैदानावर रोमांचक वातावरण निर्माण झाले होते. लेक्स कप स्पर्धेमुळे शहरातील फुटबॉल संस्कृतीला चालना मिळत असून युवा खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याचे उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

## प्रभाग क्र. २ मध्ये पाणीपुरवठ्यावर महत्त्वाची बैठक; कामचुकारांवर कारवाईचे संकेत

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २ मध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्यामुळे नागरिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत असून, प्रशासनाविरोधात नाराजी वाढत चालली आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत पाणीपुरवठा विभाग, संबंधित अधिकारी, वॉलमन आणि नगरसेवक यांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत नगरसेवक निखिल वारे आणि माजी नगरसेवक बाळासाहेब पवार यांनी वॉलमनच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तक्रारींचा अक्षरशः पाडा वाचला. प्रभागातील काही वॉलमन चांगले काम करत असले तरी काही कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणा, कामचुकारपणा आणि नागरिकांशी उद्धट वर्तन यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. नागरिक पाण्यासाठी हैराण झाले असून नगरसेवकांनाही त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नगरसेवक निखिल वारे यांनी सांगितले की, शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याबाबत यापूर्वी आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर या बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रभागातील काही वॉलमन गैरवर्तन करत असून कामाकडे दुर्लक्ष करत आहेत. अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली. तसेच महावितरणकडून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळेही पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याचे नमूद करत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून संबंधित विभागाला सूचना देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांच्या प्रश्नांवर घेतल्या जाणाऱ्या बैठका केवळ औपचारिक न राहता त्यातून प्रत्यक्ष दिलासा मिळाला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. माजी नगरसेवक बाळासाहेब पवार यांनीही प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचा पाडा वाचत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

# सावेडीतील महापौर उद्यानात बालगोपालांचा उत्साह ओसंडला !

## मैदानी खेळ, संस्कार आणि आनंदाची पर्वणी; पालकांकडून उपक्रमाचे कौतुक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सावेडी गावातील महापौर उद्यान परिसर सध्या बालगोपालांच्या आनंदाने आणि उत्साहाने फुलून गेला आहे. माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्यातील शालेय सुट्टीत मुलांनी मोबाईल आणिर् टीव्हीपासून दूर जात मैदानी खेळ, संस्कार आणि विविध कला उपक्रमांकडे वळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या समर कॅम्पमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

महापौर उद्यानात सायंकाळ पासूनच बालगोपाळांचा जल्लोष पाहायला मिळत असून विविध खेळ, व्यायाम, योगा, सांस्कृतिक उपक्रम आणि मनोरंजनात्मक स्पर्धांमुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला आहे. बालकांनी क्रिकेट, कबड्डी, दोरीखेच, लाठीकाठी, जिम्नॅस्टिक, सेल्फ डिफेन्स, एरोबिक्स, योगा अशा विविध खेळांचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनीही बालगोपाळांमध्ये मिसळत खेळांचा आनंद घेतला. आणि स्वतःच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. मुलांच्या उत्साहामुळे संपूर्ण महापौर उद्यान गजबजून गेले होते. पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा संस्कारक्षम आणि आरोग्यवर्धक उपक्रमांची आजच्या काळात



मोठी गरज असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मुले मोबाईल, व्हिडिओ गेम आणि टीव्हीमध्ये अडकून पडत आहेत. त्यामुळे त्यांचे बालपण हरवत चालले असून मैदानी खेळांपासून ते दूर जात आहेत. यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. मुलांनी निरोगी, सुदृढ आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगायचे असेल तर त्यांना बालवयातच मैदानी खेळांची आवड निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच या समर कॅम्पच्या माध्यमातून खेळ, संस्कार, कला आणि संस्कृती यांचा सुंदर संगम घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

ते पुढे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. मुलांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार निर्माण व्हावेत यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. खेळामुळे केवळ शरीर मजबूत होत नाही, तर मन देखील सक्षम बनते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊंचे संस्कार आणि आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना या शिबिरातून करून दिली जात आहे. मुलांनी अभ्यासाबरोबरच खेळ, कला आणि सामाजिक संस्कार आत्मसात करणे काळाची गरज आहे.

समर कॅम्पमध्ये मुलांना थलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, हॉर्स रायडिंग, जादू प्रयोग, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, संस्कार वर्ग, कथाकथन, मजेदार खेळ, सहल, क्रिकेट, कबड्डी, दांडपट्टा, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच जिजाऊ माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक गोष्टी आणि संस्कारांचे धडेही दिले जात आहेत. यावेळी पालकांनी सांगितले की, आजच्या काळात मुलांना चांगले संस्कार, मैदानी खेळ आणि सकारात्मक वातावरण मिळणे अत्यंत गरजेचे आहे. बाबासाहेब वाकळे यांनी घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

## द•ख•ल

## शासकीय निवासी शाळेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन

**पुणे** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत कार्यान्वित असलेल्या पुणे जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची/ मुलींच्या शासकीय निवासी शाळेत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून जास्तीत जास्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांसाठी असलेल्या दिवे (ता. पुरंदर), तरंगवाडी (ता. इंदापूर), पेठ (ता. आंबेगाव) तसेच मुलींसाठी चांडोली (ता. खेड) या ठिकाणी निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १० पर्यंत प्रवेश देण्यात येणार आहे. या निवासी शाळेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८० टक्के, अनुसूचित जमातीसाठी १० टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ५ टक्के, विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के तर दिव्यांगासाठी ३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत, असेही श्री.लोंढे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## सोमेश्वर विद्यालयाचा निकाल ९९.४७ टक्के प्रथम तीनमध्ये मुलींचीच बाजी

**सोमेश्वरनगर** : राज्यात १२ वी निकाल जाहीर झाला असून यंदाच्या निकालात पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारल्याचे चित्र आहे. बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सोमेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (विज्ञान), सोमेश्वरनगर एच. एस. सी. परीक्षा मार्च २०२६ निकाल परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी १९१ पैकी १९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल ९९.४७ टक्के लागला आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले विद्यालयातील प्रथम तीन गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक धुमाळ वैष्णवी राजेंद्र गुण ७८.५०टक्के , द्वितीय क्रमांक शेंडकर वैष्णवी नितीन ७६.३३ टक्के तर तृतीय क्रमांक यादव राही प्रदिप ७२.१७ टक्के पटकावला तसेच मागासवर्गीय प्रथम विद्यार्थी कांबळे आर्या गोरख ७१ टक्के मिळवले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, सचिव भारत खोमणे तसेच प्राचार्य प्रमोद जगताप सह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**पुणे** : केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (पीएमआयएस) २०२६' अंतर्गत देशामध्ये ३१ हजार ४८० हून जागेवर विविध नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध आहेत, जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींना संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत इंटर्नशिपचा कालावधी साधारणपणे ६ किंवा ९ महिन्यांचा असणार आहे. इंटर्नशिपदरम्यान उमेदवारांना दरमहा रुपये ९ हजार इतके विद्यावेतन देण्यात येणार असून इंटर्नशिप यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे. योजनेसाठी पात्रतेचे निकष: उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षांदरम्यान असावे. उमेदवार भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा किंवा बीए.बीएस्सी, बीकॉम, बीसीए, बीबीए, बीफार्मा शाखेत आदी पदवीधर उमेदवारांना या योजनेअंतर्गत अर्ज करता येणार आहे. पूर्णवेळ नोकरी करणारे किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत. मात्र ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेणारे उमेदवारांना अर्ज करता येणार आहे. तसेच पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थीही अर्जासाठी पात्र असतील. या योजनेत MAHINDRA AND MAHINDRA LIMITED, BAJAJ AUTO LIMITED, RELI-NCE INDUSTRIES LIMITED, BAJAJ ALLIANZ LIFE INSUR-NCE COMPANY, BERGER PAINTS INDIA LIMITED, EMCURE PHARMACEUTICALS LIMITED, HOND- MOTORCYCLE -ND SCOOTER INDIA PVT. LTD., BVG INDIA LIMITED, COGNIZANT, IBM INDIA PRIVATE LIMITED अशा नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी उपलब्ध आहे.

# डाळिंबाच्या बागेतील फळे अज्ञात चोरट्यांनी केली लंपास

**प्रतिनिधी / राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावात डाळिंब उत्पादक शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसल्याची घटना उघडकीस आली आहे. शेतकरी बाळू बबन लोखंडे यांच्या शेतातील सुमारे १२५ क्रेट डाळिंबाच्या फळांची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना बुधवारी (दि.६) सकाळी उघड झाली. नागापूर गावाजवळील प्रसिद्ध खंडोबा देवस्थान थापलिंग गडाच्या पश्चिमेकडील परिसरात लोखंडे यांची शेती आहे. त्यांनी यावर्षी प्रथमच दीड एकर क्षेत्रात डाळिंबाची लागवड केली होती. यासाठी त्यांनी तीन लाख रुपयांचे भांडवल गुंतवले आहे. बागेत सध्या मोठ्या प्रमाणात फळे लागलेली असून पुढील पंधरा दिवसांत तोडणी सुरू होणार होती.



मात्र, त्याआधीच चोरट्यांनी बागेवर डल्ला मारत मोठ्या प्रमाणात फळे लंपास केली. शेतकरी बाळू लोखंडे यांनी सांगितले की चोरट्यांनी सुमारे १२५ क्रेट डाळिंबाची फळे चोरून नेली आहेत. सध्या बाजारात डाळिंबाला प्रतिकिलो २५० ते ३०० रुपये दर मिळत असून एका क्रेटमागे साधारणपणे पाच हजार रुपये उत्पन्न मिळते. या हिशोबाने आमचे जवळपास अंदाजे ६ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

बुधवारी सकाळी बाळू लोखंडे बागेत पाणी देण्यासाठी गेले असता ही चोरी उघडकीस आली. बागेतील फळे गायब झाल्याचे पाहून त्यांना मोठा धक्का बसला. त्यांनी तत्काळ नागापूर येथील सामाजिक कार्यकर्ते विजय चासकर यांना घटनेची माहिती दिली. दरम्यान, या घटनेबाबत लोखंडे पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी जाणार आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतीमालाच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी पोलिस प्रशासनाने या प्रकरणाचा तातडीने तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा, तसेच शेतीमालाच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या प्रसारासाठी महावितरणचा पुढाकार

**प्रतिनिधी / राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' घराघरांत पोहोचवण्यासाठी महावितरणच्या पुणे परिमंडलाने कंबर कसली आहे. शुक्रवारी रास्ता पेठ शहर मंडल, गणेशखिंड शहर मंडल आणि पुणे ग्रामीण मंडलातील सर्व उपविभाग व शाखा कार्यालयांतर्गत महावितरणचे वीज कर्मचारी थेट गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन या योजनेचा प्रसार करणार आहेत.

पुणे परिमंडलात आतापर्यंत ३४३१२ ग्राहकांनी सूर्यघर योजनेचा लाभ घेतला आहे. त्याची क्षमता १७० मेगावॉट इतकी असून सूर्यघर योजनेमुळे या ग्राहकांचे वीजबिल शून्यवत झाले आहे. केंद्र सरकार सूर्यघर योजनेसाठी १ किलोवॅट प्रकल्पाला ३०,००० रुपये, २ किलोवॅट प्रकल्पासाठी ६०,००० रुपये तर ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८,००० रुपये इतके अनुदान देत आहे. एका किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सरासरी १२० युनिट वीज तयार होते. सूर्यघर प्रकल्पासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून ९० टक्क्यांपर्यंत कर्ज सुद्धा मिळते.

# मॅक्स पिकअप चोरी प्रकरणी आरोपी जेरबंद

## दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : घरासमोर पार्क केलेली महिंद्रा मॅक्स पिकअप गाडी चोरणाऱ्या आरोपीला आळेफाटा पोलिसांनी संगमनेर येथून अटक केली. नदीम युनुस शेख (वय ३४, रा. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेली २ लाख रुपये किमतीची गाडी जप्त करण्यात आली आहे.



शेषराव कुंडलिक गायकवाड (वय ५२ रा. मुकई मळा, ता. जुन्नर) यांनी २ मे रोजी आळेफाटा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यांची एम. एच.१४ ए.झेड ७६५० क्रमांकाची पिकअप गाडी २४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता घरासमोर लावली होती. २५ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता पाहिले असता गाडी जागेवर नव्हती. परिसरात शोध घेऊनही गाडी न सापडल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी गुन्हे शोध पथकाला सूचना दिल्या. पथकाने सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने तपास करून आरोपीचा माग काढला. आरोपी नदीम शेख याला संगमनेर येथून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीकडून चोरीची गाडी हस्तगत करण्यात आली असून त्याला पोलीस कोठडी देण्यात आली आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विश्वास जाधव, पोलीस हवलदार भिमा लोंढे, विनोद गायकवाड, पंकज पारखे, अमित माळुंजे,नविन अरगडे, ओंकार खुणे, गणेश जगताप यांच्या पथकाने केली आहे.

# टपाल जीवन विम्याचा मृत्यू दावा निकाली; वारसदारांना दिलासा

**प्रतिनिधी / राष्ट्र सह्याद्री**




**पुणे** : भारतीय टपाल विभागाच्या पुणे हेड पोस्ट ऑफिसच्या पोस्टल लाइफ इन्शुरन्स अंतर्गत एका महत्त्वाच्या मृत्यू दाव्याचे यशस्वीरित्या निवारण करण्यात आले. विमाधारक संतोष प्रतापसिंग पाटील हे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे कार्यरत होते. त्यांनी टपाल विभागाची विमा योजना घेतली होती. त्यांच्या निधनानंतर वारसदार भारती एस. पाटील यांनी दावा दाखल केला होता.

टपाल विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून विमा रक्कम १० लाख रुपये आणि बोनससह एकूण ११ लाख ५५ हजार ४५६ रुपयांची सेटलमेंट मंजूर केली. विमाधारकाने एकूण ३ लाख ६१ हजार ३८० रुपयांचा हप्ता भरला होता. भरलेल्या हप्त्याच्या तुलनेत कुटुंबाला मोठी आर्थिक मदत टपाल विभागामार्फत देण्यात आली.वारसदार भारती एस. पाटील यांनी सांगितले की, कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतर भविष्याची चिंता वाढली होती. अशा कठीण काळात टपाल विभागाने विमा दाव्याची तत्परतेने दखल घेत मोठा मानसिक आणि आर्थिक आधार दिला. पोस्टल लाइफ इन्शुरन्स ही सर्वसामान्यांसाठी सुरक्षित आणि फायदेशीर योजना असल्याचा प्रत्यय या माध्यमातून आला. नागरिकांनी कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यासाठी झडख योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. पुणे हेड पोस्ट ऑफिसचे सिनियर पोस्टमास्टर अमेय निमसुडकर यांनी सांगितले की, पोस्टल लाइफ इन्शुरन्स ही कमी प्रीमियममध्ये अधिक बोनस देणारी सुरक्षित योजना आहे. संकटकाळात कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या टपाल विभागाच्या वचनबद्धतेचे हे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

# 'ओम श्री क्लिनिक'मध्ये चोरी

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे माजी पंचायत समिती सदस्या डॉ. कल्पना सुभाष पोकळे यांच्या गावठाणात असलेल्या 'ओम श्री क्लिनिक'मध्ये भरदिवसा धाडसी चोरी झाल्याची घटना समोर आली आहे.अज्ञात चोरट्याने दवाखान्यात शिरून अंदाजे २ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोकड लंपास केल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दि.२ ला दुपारच्या सुमारास ही घटना घडली. डॉ. कल्पना पोकळे यांचा कवठे येमाई येथे 'ओम श्री क्लिनिक' नावाने दवाखाना आहे. दवाखान्याचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. त्यानंतर टेबल खाली ठेवलेली पर्स चोरून नेली. त्या पर्समध्ये सोन्याची अंगठी, बांगडी, गंठण, मणीमंगळसूत्र तसेच दोन हजार रुपयांची रोकड होती.

काही वेळानंतर पर्स आढळून न आल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. डॉ. पोकळे यांनी तात्काळ शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे. भरदिवसा दवाखान्यासारख्या गर्दीच्या ठिकाणी चोरीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.परिसरातील व्यापारी व नागरिकांनी पोलिसांनी गस्त वाढवून अशा घटनांवर आळा घालावाअशी मागणी केली आहे.

# माऊली पालखी सोहळा पुणे मुक्कामाचा निर्णय १३ मे रोजी आळंदीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी** : संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात वारकरी व भाविकांना केंद्रस्थानी ठेवून पुण्यातील मुक्कामाबाबत अंतिम निर्णय प्रशासनाच्या लेखी अहवालानंतरच घेतला जाणार आहे. यासाठी १३ मे रोजी आळंदीत दिंडी समाज, फडकरी व मानकरी यांच्यासोबत बैठक होणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप व विश्वस्त चैतन्य महाराज कबीर यांनी दिली. पालखी विठोबा मंदिर परिसरात आज जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने आदींसह संयुक्त पाहणी झाली. यावेळी पुणे महापालिकेकडून ३१ मेपर्यंत मंदिर परिसरातील इमारती ताब्यात घेऊन आवश्यक सुविधा उभारण्याचे आश्वासन देण्यात आले. माऊलींची पालखी ८



जुलैला आळंदीतून प्रस्थान करणार असून ९ व १० जुलैला पुण्यातील भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात मुक्काम अपेक्षित आहे.

मात्र तेथील अपुरी जागा आणि सुविधांबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली. महिला वारकऱ्यांसाठी विशेष व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांवर स्वच्छतागृहे, तसेच सुमारे २० जर्मन हँगर मंडप उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, समाधानकारक व्यवस्था न झाल्यास बाबुराव सणस मैदान हा पर्यायही विचाराधीन असल्याचे देवस्थानने स्पष्ट केले. ११ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आणखी एक आढावा बैठक होणार असून, त्यानंतरच अंतिम वेळापत्रक जाहीर होणार आहे.

# शिरूरमध्ये वारंवार वीज खंडित; नागरिकांमध्ये संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूर शहरातील मारुती आळी,सरदार पेठ तसेच रामलिंग रस्ता परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिक आणि व्यापारी वर्ग प्रचंड त्रस्त झाला आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून महावितरण प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.




स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित भागातील विद्युत रोहित्रांवर अतिरिक्त भार पडत असल्याने कमी व्होल्टेज, फेज जाणे आणि वारंवार वीज खंडित होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. परिणामी घरगुती वापरासोबतच व्यावसायिक आस्थापना, दवाखाने, लिफ्ट, मोटारी तसेच बाजारपेठेतील विविध उपकरणांच्या कामकाजावर परिणाम होत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत विजेचा वापर वाढल्याने सध्याची यंत्रणा अपुरी पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना उकाड्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या समस्येबाबत परिसरातील वीज ग्राहकांनी महावितरण कार्यालयाला निवेदन दिले असून संबंधित भागातील रोहित्रांची क्षमता तातडीने वाढवावी, कमी व्होल्टेज चा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा आणि नियमित वीज पुरवठा सुरळीत करावा,अशी मागणी करण्यात आली आहे.महावितरण प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन योग्य उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विनीत बोरा, सागर चव्हाण, राजेंद्र लोढा व इतर स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# जोरी यांच्याविरोधात 'अविश्वास' मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई** : शिरूर तालुक्यातील जांबुत ग्रामपंचायतीचे सरपंच दत्तात्रय रामचंद्र जोरी यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव सोमवारी झालेल्या विशेष सभेत बहुमताने मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायत स्थापनेपासून प्रथमच अशा प्रकारचा अविश्वास ठराव मंजूर झाल्याने गावातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी अकरा वाजता ही विशेष सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के होते. सभेसाठी ग्रामपंचायतीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच दत्तात्रय जोरी यांच्या कार्यपद्धतीबाबत काही सदस्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. विकासकामांमध्ये होत असलेला विलंब, प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, तसेच सदस्यांना विश्वासात न घेता घेतले जाणारे निर्णय या मुद्द्यांवरून सदस्यांनी तीव्र अ समाधान व्यक्त केले. याच पार्श्वभूमीवर सरपंचांविरोधात अविश्वास ठराव दाखल करण्यात आला होता.

सभेदरम्यान सदस्यांमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. काही सदस्यांनी ग्रामपंचायतीतील कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करताना गावाच्या विकासासाठी सक्षम नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत मांडले. त्यानंतर घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेत बहुसंख्य सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे ठराव अधिकृतपणे मंजूर करण्यात आला.

दरम्यान, या घडामोडीनंतर जांबुत ग्रामपंचायतीत पुढील राजकीय समीकरणांना वेग येणार असल्याची चर्चा गावात सुरू झाली आहे. नवीन सरपंच निवडीसाठी लवकरच प्रक्रिया पार पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पुणे जिल्ह्यातील धरणांत ४७ टीएमसी साठा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : वाढत्या उन्हामुळे जिल्ह्यातील धरणांमधील पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळी आवर्तनामुळे आतापर्यंत मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर झाला असून सध्या धरणांमध्ये ४७.१३ टक्के म्हणजेच २७ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. येत्या एक ते दोन महिन्यांत शेतकऱ्यांनी पाण्याचे काटेकोर नियोजन केल्यास संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता काही प्रमाणात कमी राहू शकते, असा अंदाज जलसंपदा विभागाने व्यक्त केला आहे. जिल्हयात एकूण २६ धरणे आहेत. या धरणांची एकूण उपयुक्त साठवण क्षमता १९८.३४ टीएमसी असून, गेल्या वर्षी पावसाळ्यानंतर तब्बल २०२.६७ टीएमसी (१०२ टक्के) इतका साठा नोंदवला गेला होता. मात्र, मागील सहा महिन्यांत झालेल्या वापरामुळे सध्या धरणांमध्ये सुमारे २३ टक्के पाणी उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत हा साठा ३२.९२ टीएमसी म्हणजेच १६ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा तुलनेने अधिक पाणीसाठा असल्याचे दिसून येते

**शहरांचा वाढता पाणीपुरवठा :**

जिल्ह्यातील बहुतांश धरणे पश्चिम भागात असून उजनी धरण वगळता इतर सर्व धरणे पश्चिमेकडे आहेत. वाढती लोकसंख्या लक्षात घेता पुणे आणि पिंपरी-चिंचवड या शहरांना प्रामुख्याने खडकवासला धरण, चासकमान धरण आणि पवना धरण येथून पाणीपुरवठा केला जातो. तसेच पूर्वेकडील तालुक्यांसाठी शेतीसाठी आवर्तन सोडण्यात आले आहे.



**सात धरणांतून कालव्यांना विसर्ग :**

सध्या उन्हाळी पिकांसाठी आवश्यक पाणी उपलब्ध राहावे, यासाठी चालू महिन्यांपासून धरणांतून आवर्तन सुरू करण्यात आले आहे. याचा लाभ आंबेगाव, शिरूर, खेड, इंदापूर, बारामती, दौंड आणि पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना होत आहे. सध्या खडकवासला, चासकमान, वीर, पिंपळगाव जोगे, डिंभे, घोड आणि उजनी धरण या सात धरणांतून डाव्या व उजव्या कालव्यांसह बंद जलवाहिनीद्वारे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे धरणांतील पाणीपातळी हळूहळू घटत आहे. सध्या पाणीसाठा समाधानकारक असला तरी पुढील काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी पाण्याची मागणी वाढून धरणांतील साठा झपाट्याने कमी होण्याची शक्यता जलसंपदा विभागाने वर्तविली आहे.

**धरणनिहाय असलेला पाणीसाठा, टीएमसीमध्ये :**

टेमघर ०.०३, वससगाव ४.११, पानशेत ४.८०, खडकवासला ०.७९, पवना ३.१८, कासारसाई ०.२०, कळमोडी १.१६, चासकमान १.७६, भामा आसखेड ३.६९, आंद्रा १.२६, वडिवळे ०.६०, शेटफळ ०.२६, नाझरे ०.१२, गुंजवणी ०.९८, भाटघर ६.४९, निरा देवघर ३.७३, वीर ४.८६, पिंपळगाव जोगे ०.८७, माणिकडोह ०.७४, येडगाव ०.९३, वडज ०.५२, डिंभे २.८८, चिल्हेवाडी ०.५८, घोड ०.६६, विसापूर ०.१७, उजनी १.७७, मुळशी ६.७२

द•ख•ल

## बालविवाह रोखण्यासाठी कायद्याची महत्त्वपूर्ण भूमिका : ॲड. शेळके

**श्रीगोंदा** : भारतामध्ये मुलींच्या विवाहासाठी किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे.यामागे सामाजिक, वैद्यकीय आणि कायदेशीर कारणांचा ठोस आधार असल्याचे प्रतिपादन ड. अमोल शेळके यांनी केले. बालविवाह रोखण्यासाठी केंद्र सरकारने सन २००६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा लागू केला असून मुलींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही तरतूद महत्त्वाची ठरत आहे. अल्पवयीन मुलींचे जबरदस्तीने विवाह लावणे, त्यांचे मानसिक व शारीरिक शोषण होणे तसेच शिक्षणापासून वंचित राहण्याच्या घटना रोखण्यासाठी हा कायदा प्रभावी मानला जातो. १८ वर्षांपूर्वी झालेला विवाह संबंधित मुलीला रद्द करण्याचा अधिकार कायद्याने देण्यात आला असून अशा विवाहात सहभागी होणाऱ्या पालकांवर आणि संबंधित व्यक्तींवर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. कमी वयात विवाह झाल्यास मातृत्वामुळे मुलींच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच मानसिक परिपक्वता नसताना संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळताना अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे मुलींच्या शारीरिक, मानसिक व शैक्षणिक विकासासाठी १८ वर्षांची वयोमर्यादा आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.मुलींना योग्य वयात शिक्षणाची संधी मिळाल्यास आर्थिक स्वावलंबन वाढते, निर्णयक्षमता विकसित होते आणि समाजात सन्मानाने जगण्याचा अधिकार अधिक मजबूत होतो. बालविवाहामुळे दारिद्र्य, अत्याचार आणि सामाजिक मागासलेपणा वाढण्यास हातभार लागतो, असेही ॲड. शेळके यांनी नमूद केले. भारतामध्ये बालविवाहाविरोधातील चळवळ १९व्या शतकापासून सुरू असून समाजसुधारक राजा राममोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी या कुप्रथेविरोधात जनजागृती केली होती. त्यानंतर १९२९ मध्ये कायदा कायदा लागू करण्यात आला. पुढे २००६ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यामुळे मुलींच्या हक्कांच्या संरक्षणाला अधिक बळ मिळाले आहे.१८ वर्षांची वयोमर्यादा ही मुलींच्या सुरक्षित आणि सक्षम भविष्यासाठी आवश्यक आहे, असे मत ॲड. अमोल शेळके यांनी व्यक्त केले.

## माही जळगाव येथे संत निरंकारी सत्संग मेळावा संपन्न



**माही जळगाव** : आज माही जळगाव चौफुल्यावर सरकारी विश्रामगृह समोर संत निरंकारी बाबा सत्संग मेळावा आयोजित करण्यात आला होता. या सत्संग मेळाव्याचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विचारमंच प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते सुदामाबा जाधव ज्यांच्या माध्यमातून सत्संग मेळावा नियोजन करण्यात आले. ज्योतिबा पन्हाळकर, सुखदेव लोखंडे, श्याम भोसले, सुनिता भोसले, भीमराव जाधव ,हर्षद भोसले ,वडगावचे सूर्यवंशी महाराज आजच्या सत्संगाचे व्याख्याते लाभले. या सत्संग मध्ये निरंकार बाबा यांचे विचार समाजाला दिशा देणारे योगदान आहे. तरुण पिढी निर्व्यसनी राहिली पाहिजे असे उद्गार सूर्यवंशी महाराज यांनी आपल्या वाणीतून सत्संग मेळाव्यात मार्गदर्शन केले. आजच्या सत्संग मेळाव्यातून रामचंद्र महाराज सूर्यवंशी यांनी आपल्या वाणीतून सत्संगमार्फत विचार गीत गायन मंगलचरण उध्वनी या माध्यमातून खऱ्या देवाची ओळख निर्माण होते. खऱ्या देवाची ओळख करून समाजाला दिशा देण्याचे काम सत्संग माध्यमातून मिळते. माही जळगाव परिसरात प्रत्येक गुरुवारी ११ ते २ या वेळेत येथे संत निरंकारी सत्संग मेळावा आयोजित करण्यात येत आहे. तरी परिसरातील सर्व नागरिकांनी संत निरंकारी सत्संग मेळाव्याचा आनंद घ्यावा. आज माही जळगाव निरंकारी सत्संग मेळाव्याचे अन्नदाते दत्तात्रय महाराज उदमले होते. शेवटी सर्वांचं आभार सामाजिक कार्यकर्ते व सत्संग मेळावा आयोजक ज्योतिबा पन्हाळकर व सुखदेव लोखंडे यांनी आभार मानले.

## घारगावच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड आणि एम.एड विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**लिंपणगाव** : घारगाव येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत कार्यरत श्री दत्तकृपा शैक्षणिक संकुलाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, येथे बी.एड व एम.एड द्वितीय वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र गोंटे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सावित्रीबाई फुले प्रतिमाच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावाही घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्री दत्तकृपा शिक्षण संकुलाच्या सचिव सौ.अर्चनाताई पानसरे, संस्थेचे रजिस्टर कल्याण शिंदे हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. सौ.अर्चनाताई पानसरे म्हणाल्या की, शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे. बी.एड व एम. एडचे विद्यार्थी भविष्यात शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. त्यांनी केवळ नोकरीपुरते मर्यादित न राहता समाज परिवर्तनासाठी कार्य करावे. संस्थेचे रजिस्टर कल्याण शिंदे म्हणाले की, महाविद्यालयात घेतलेले शिक्षण, अनुभव आणि संस्कार हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यभर उपयोगी पडतात. प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यश मिळवावे. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये महाविद्यालयातील तब्बल २२ विद्यार्थ्यांनी ढएढ आणि उढएढ परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला. तसेच ६ विद्यार्थ्यांनी छएढ आणि डएढ परीक्षा उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय यश संपादन केले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. मच्छिंद्र गोंटे म्हणाले की, विद्यार्थ्यांचे यश हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे. कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर विद्यार्थी मोठे यश मिळवू शकतात. त्यांनी भविष्यात आणखी विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमादरम्यान बी.एड व एम.एड २०२४-२०२६ च्या संपूर्ण बॅचला निरोप देण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या दोन वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिक्षण, प्राध्यापकांचे मार्गदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि मित्रांसोबतचे अनुभव सांगताना भावनिक वातावरण निर्माण झाले. महाविद्यालयाने आम्हाला केवळ शिक्षणच दिले नाही, तर आयुष्य जगण्याची दिशा दिली, असे मत अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाने दिलेल्या सकारात्मक वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले.

# कांद्याला भाव नाही शेतकरी आर्थिक संकटात

### उत्पादन खर्चही निघेना; शासनाच्या हस्तक्षेपाची मागणी : फुंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अमरापूर** : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. लाखो रुपये खर्च करून पिकवलेल्या कांद्याला बाजारात केवळ ८ ते १२ रुपये प्रति किलो दर मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. वाढलेले बियाणे, खत, औषधे, मजुरी व वाहतूक खर्च यामुळे कांदा उत्पादनाचा खर्च प्रचंड वाढला असताना बाजारभाव मात्र अत्यंत घसरल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून कांद्याचे पीक घेतले; मात्र उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याने त्यांच्या मेहनतीचा मोबदला मिळत नाही. परिणामी शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होत असून आर्थिक विवंचनेत सापडला आहे.

कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे ग्रामीण भागात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांदा खरेदी केंद्रे सुरू करावीत तसेच किमान २५ रुपये प्रति किलो हमीभाव जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

आज कांदा रडतोय उद्या शेतकरी संपेल, अशी संतप्त भावना स्वाभिमान शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ताजी फुंदे यांनी व्यक्त केले . शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने वेळीच लक्ष न दिल्यास आंदोलन तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असो. च्या ठेकेदारांचे कामबंद आंदोलन सातव्या दिवशीही सुरू?

**अहिल्यानगर** : विविध प्रलंबित मागण्या आणि मागील देयके तात्काळ मिळावीत या प्रमुख मागण्यांसाठी सुरू असलेले इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभाग यांचे कामबंद आंदोलन आज सातव्या दिवशीही तीव्रतेने सुरूच आहे. राज्यभरातील क्ढ, ड्ढ, उ्ढउ तसेच इतर सर्व प्रकारची कामे पूर्णपणे बंद ठेवून ठेकेदारांनी आंदोलनाचा पवित्रा कायम ठेवला आहे. सात दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस भूमिका किंवा निर्णय घेण्यात आलेला नसल्याने ठेकेदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेली देयके अद्याप न मिळाल्यामुळे ठेकेदारांवर आर्थिक संकट कोसळले असून कामे सुरळीतपणे चालवणे कठीण झाले आहे.

अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊन तसेच चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र प्रशासनाकडून केवळ आश्वासनेच मिळाली आहे.

प्रत्यक्षात कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, अशी खंतही व्यक्त करण्यात आली.

## पत्रिकेपेक्षा विश्वास मोठा शिंदे यांचा नव्या पिढीला संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरणजीक साळवन देवी रोडवरील उत्कृष्ट उद्योजक नाना शिंदे यांचा २७ वा लग्नाचा वाढदिवस ८ मे २०२६ रोजी साजरा होत आहे.त्यांच्या आयुष्यातील एका वेगळ्या आणि प्रेरणादायी लग्नकथेची सध्या तालुक्यात चर्चा रंगली आहे. पत्रिका नव्हे, तर परस्पर विश्वास आणि समजूतदारपणा संसार टिकवतो, असा संदेश त्यांनी नव्या पिढीला दिला आहे.

सन १९९९ मध्ये कोकणगाव येथील शेंडगे परिवारातील नंदा शेंडगे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. मात्र हा विवाह जमविताना दोन्ही कुटुंबांना प्रचंड अडथळ्यांचा सामना करावा लागला. विविध पंचांग पाहणाऱ्या ज्योतिषांकडे पत्रिका दाखविण्यात आल्या, पण कोणतीही पत्रिका जुळत नव्हती. काही ज्योतिषांनी तर हा विवाह झाला तर गंभीर अडचणी येऊ शकतात, असा इशाराही दिला होता.तरीही दोन्ही कुटुंबांची मनापासून इच्छा असल्याने प्रयत्न सुरूच राहिले. अखेर एका फॅमिली ज्योतिषांनी काही अडचण नाही, लग्न लावून टाका, असा सल्ला दिल्यानंतर हा विवाह झाला.

सर्वात विशेष बाब म्हणजे नाना शिंदे मुलगी पाहण्यासाठी गेले तेव्हा त्यांच्यासोबत त्यांचा मुस्लिम मित्र मुन्ना तांबोळी, बौद्ध समाजातील डॉक्टर घोडके आणि मेहुणे खंडू खराडे असे अवघे तिघेच होते. मित्रांच्या मोटारसायकलीवरून झालेली ती नवरी पाहणी आजही त्यांच्या आठवणीत आहे. शिंदे सांगतात, मुलगी पाहिल्यानंतर सुरुवातीला माझा होकार नव्हता. पण माझ्या मुस्लिम मित्राने मला समजावले रंग महत्त्वाचा नसतो, संसार करणारी मनाची श्रीमंती महत्त्वाची असते. 'ही मुलगी शांत आणि सहनशील आहे, तुझा संसार नक्की सांभाळेल.' मित्राच्या त्या शब्दांवर मी होकार दिला.त्यावेळी ते वेल्डिंगचे काम करत होते. श्रीगोंदा शहरातील काळकाई चौक परिसरातील ओहोळ हॉटेलमध्ये काळ्या कामाच्या कपड्यांवरच विवाह जुळल्याची आठवण त्यांनी हसत सांगितली.आज तब्बल २७ वर्षांनंतरही त्यांचा संसार आनंदाने सुरू असून, ते नव्या पिढीला स्पष्ट संदेश देतात अतिरिक्त पत्रिका, मंगळ आणि भीती यामध्ये अडकून अनेक चांगले विवाह मोडतात. स्वतःवर विश्वास ठेवा. संसार पत्रिकेवर नाही, तर समजूतदारपणा, प्रेम आणि संयमावर टिकतो.सर्व धर्म आणि जातीतील मित्रांनी एकत्र येऊन घडवलेली ही लग्नकथा आजच्या समाजासाठी सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश देणारी ठरत आहे. अपना मन चंगा तो कठौती में गंगा, या संत रोहिदासांच्या उक्तीप्रमाणे मन स्वच्छ असेल तर संसारही सुंदर होतो, असेही नाना शिंदे यांनी सांगितले.

## शेवगाव शहरात अत्याधुनिक गोरखा अग्निशामक वाहनाचे लोकार्पण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर** : शेवगाव शहरासाठी अत्याधुनिक 'गोरखा' अग्निशामक वाहनाचे लोकार्पण आज बसस्थानक परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. नव्या वाहनामुळे शहरातील अग्निशमन विभाग अधिक सक्षम व सज्ज झाला असून आपत्कालीन परिस्थितीत जलद व प्रभावी प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी हे वाहन अत्यंत उपयुक्त ठरेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

या लोकार्पण सोहळ्यास शिवसेनेचे अरुण मुंढे, नगरपरिषद मुख्याधिकारी सौ. विजया घाडगे, पंचायत समितीचे माजी सभापती क्षितिज भैय्या घुले, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, जाधवर साहेब, उपनगराध्यक्ष ताहेरभाई पटेल यांच्यासह नगरसेवक आशुतोष डहाळे, नंदूभाऊ मुंढे, साईनाथ आधाट, वजीरभाई पठाण, जाकीरभाई कुरेशी, प्रविण भारस्कर, कैलास तिजोरे, सुनिल काकडे, संतोष जाधव, संजयभाऊ कोळगे, हरिषशेठ भारदे, जगदीश शेठ धूत, डॉ. कृष्णा देहाडराय, बाळासाहेब उर्फ नानूभाऊ देशपांडे, सालारभाई शेख, राजूभाऊ तरटे, सुरेश मामडे, राहुल भारस्कर, अभय पालवे, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते तसेच सर्व नगरसेवक, अधिकारी, पोलीस कर्मचारी, पत्रकार बांधव, ज्येष्ठ नागरिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम उत्साहात पार पडला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी अशा अत्याधुनिक सुविधांची उभारणी सातत्याने करण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी मान्यवरांनी दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## पुस्तकांनी माणसे घडतात तर मोबाईलने बिघडतात

### चिचोंडीत वकृत्व स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**चिचोंडी पाटील** : पुस्तकांनी माणसे घडतात तर मोबाईलने ती बिघडतात. मोबाईल वापरताना संयम हवा. प्रत्येक घरात पुस्तके हवीत. मोबाईल आभासी जग दाखवते तर पुस्तके वास्तव जगाची जाणिव करून देतात .असा सूर प्रबोधन वक्तृत्व स्पर्धेतील वक्त्यांच्या भाषणातून उमटला.

चिचोंडी पाटील येथील प्रबोधनमंच व स्वांतत्र्यवीर सावरकर वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . त्या स्पर्धेत सहभागी स्पर्धकातून हे मत व्यक्त करण्यात आले .

ही वक्तृत्व स्पर्धा चार गटात घेण्यात येऊन या सर्व गटांना वेगवेगळे विषय देण्यात आले होते. यात बाल गटासाठी : 'मला आवडलेली गोष्ट कुमार गटा साठी :' 'माझा आवडता लेखक' युवल गटा साठी : 'मला आवडलेले पुस्तक' असे साहित्य संबंधित विषय ठेवण्यात आले होते.

त्यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत शिवाजी सावंत, प्र. के. अत्रे, अण्णाभाऊ साठे, पु. ल. देशपांडे, संजय कळमकर, वैभव ढुस आदी आवडत्या लेखकांवर विद्यार्थ्यांनी भाषणे केली. ती ऐकून चिचोंडीकर ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले.

खुल्या गटासाठी ठेवण्यात आलेला विषय होता समाजहिताचे काय ? पुस्तके की मोबाईल ?. या विषयावर प्रा. बबन शिंदे, प्रकाश ठोंबरे, सृष्टी पाचारणे , संजय ठोंबरे , संदीप कोकाटे, अविष्कार कळमकर, गणेश शिंदे, मारुती खडके यांनी आपले विचार व्यक्त केले.

स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना १२ मे ते १४ मे दरम्यान होणाऱ्या प्रबोधन व्याख्यानमालेतील व्याख्यात्यांच्या हस्ते बक्षिसे वितरण करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.बापू गुंजाळ व कृष्णा पाचारणे यांनी काम पाहिले.

परीक्षक प्रा.बापू गुंजाळ म्हणाले की, चिचोंडी पाटील येथील प्रबोधत मंचातर्फ सुरु करण्यात आलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे . स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांनी अभ्यासपूर्ण भाषण केले . गावाचा हा उपक्रम इतरांसाठी दिशादर्शक ठरेल.

स्पर्धा यशस्वीतेसाठी विलास दवणे, कल्याण ठोंबरे, दत्तू कोकाटे, युवराज देवकर, मुस्तफा मणियार, अरुण दवणे, संजय पवार, प्रशांत कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**मुलांची उदासीनता ही धोक्याची घंटा : डॉ. कळमकर**

स्पर्धेतील बहुतांशी स्पर्धक मुली होत्या . खेड्यापासून शहरापर्यंत मुलांची उदासीनता ही धोक्याची घंटा आहे . तरुण स्पर्धकांना आकर्षित करण्यासाठी बक्षीसे असूनही फक्त बारावीच्या एका मुलीने वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला . वाढत्या वयातील मुले सांस्कृतिक व संस्कारी गोष्टीपासून दूर जात आहेत. ही पालकांच्या व समाजाच्या दृष्टीने काळ्या भविष्याची चाहूल आहे . तरुणांना सामाजिक , सांस्कृतिक, नैतिक भान व जाण यावे यासाठीच प्रबोधनमंच स्थापन करण्यात आला आहे .

## पावसाळ्यापूर्वी रोज एक रस्ता खुला करण्याच्या दिशेने दमदार वाटचाल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : कागदावर असलेले शासन निर्णय प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर उतरवण्यासाठी शिवपानंद शेत रस्ते चळवळ निस्वार्थ, राजकारणविरहित आणि सातत्यपूर्ण पद्धतीने प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करत आहे.

श्रीगोंदा तालुक्यात पावसाळ्याच्या आधी रोज एक रस्ता खुला करण्याचे प्रशासन व चळवळीचे संयुक्त ध्येय असून त्याचाच एक भाग म्हणून ६ मे रोजी रुईखेल-खांडवी नकाशावरील रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा/पारनेर श्रीकुमार चिंचकर, श्रीगोंदा चे तहसीलदार सचिन डोंगरे , नायब तहसीलदार विनीत शिर्के, व भूमी उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशाने तसेच महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वीपणे पार पडली.

कर्तव्यदक्ष मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी अत्यंत जबाबदारीने रुईखेल-खांडवी नकाशे रस्त्याचे सीमांकन पूर्ण केले. त्यानंतर मंडळ अधिकारी बाळासाहेब सुद्रिक, तलाठी प्रतीक धनवटे, पीएसआय भैलोमे साहेब व त्यांच्या सहकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून रस्ता खुले करण्याची प्रक्रिया तत्परतेने सुरू करण्यात आली. पुढील दोन ते तीन दिवसांत संपूर्ण रस्ता खुले करण्याची कारवाई पूर्ण होणार असल्याची माहिती देण्यात आली.

या संपूर्ण कारवाई दरम्यान रुईखेल ग्रामस्थांनी प्रशासनाला व चळवळीला मोलाचे सहकार्य केले. ग्रामस्थांच्या सकारात्मक भूमिकेमुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत व निर्विघ्नपणे पार पडली. याबद्दल चळवळीच्या वतीने दादासाहेब जंगले पाटील आणि अ‍ॅड. कडूस यांनी सर्व ग्रामस्थ, महसूल, भूमी अभिलेख, पोलीस प्रशासन व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

## श्रीनाथ मंदिर परिसरातील अतिक्रमणाविरोधात नागरिक आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जामखेड तालुक्यातील मौजे नायगाव येथील श्रीनाथ मंदिर परिसरात वाढलेल्या अतिक्रमणांविरोधात स्थानिक नागरिकांनी आक्रमक भूमिका घेतली असून, अतिक्रमणे तात्काळ हटविण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

जामखेडच्या नायगाव येथील युवराज अर्जुन गायकवाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीनाथ मंदिर परिसर व ग्रामपंचायत हद्दीत काही व्यक्तींनी अनधिकृतपणे टपऱ्या, दुकाने व इतर बांधकामे उभारून जागा अडवून ठेवली आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सार्वजनिक जागेचा वापर मर्यादित झाला आहे.

# श्रीगोंदा उभारणार अत्याधुनिक शेतकरी भवन

### शासनाकडून १ कोटी ५८ लाखाच्या कामास मान्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शेतकरी सुखी तर बाजार समिती मजबूत या धर्तीवर श्रीगोंदा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात सभापती अतुल लोखंडे आणि सर्व संचालकांच्या प्रयत्नाने नवीन अत्याधुनिक शेतकरी भवन उभारण्यास राज्य शासनाने हिरवा कंदील दाखवला आहे. तब्बल १ कोटी ५८ लाख १३ हजार ४५४ रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. शेतकरी बांधवांसाठी ही मोठी दिलासादायक आणि ऐतिहासिक बाब मानली जात आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि. ७ मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत श्रीगोंदा येथे हे भवन उभारण्यात येणार आहे. या भवनामुळे बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना मुक्काम, स्वच्छता, मूलभूत सुविधा आणि विश्रांतीची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

शासनाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकात इमारत बांधकाम, इलेक्ट्रिफिकेशन, जीएसटी,



विमा, साहित्य तपासणी, रॉयल्टी आदी सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे. शासनाकडून सुमारे ७६.४६ लाख रुपयांचे अनुदान दोन टप्प्यात देण्यात येणार असून उर्वरित निधी बाजार समितीला स्वनिधी अथवा कर्जाच्या माध्यमातून उभारावा लागणार आहे.

शासन निर्णयात बांधकाम एका वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्याकडून तांत्रिक मान्यता घेतल्यानंतरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.श्रीगोंदा बाजार समिती अ वर्गातील बाजार समिती असल्याने शेतकरी सुविधांच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण मानला जात आहे. ग्रामीण भागातील शेतकरी बाजारात माल विक्रीसाठी येताना मुक्काम आणि सोयीसुविधांच्या अभावामुळे होणारी गैरसोय आता मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.शेतकऱ्याच्या घामाला आता निवाऱ्याची सावली मिळणार, अशी प्रतिक्रिया बाजार परिसरात उमटत असून, अनेक वर्षांची मागणी अखेर मार्गी लागल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे उपसभापती मनीषा मगर यांच्यासह सर्व संचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.या कामी उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, पणन मंत्री जयकुमार रावलं माजी आमदार राहुल जगताप, नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांचे विशेष सहकार्य लाभले असे सभापती अतुल लोखंडे यांनी बोलताना सांगितले आहे

## माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे साई दर्शन

**शिर्डी :** भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आपल्या कुटुंबासमवेत साईबाबांचे दर्शन घेत मनोभावे पूजा केली. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे,मंदिर प्रमुख विष्णू थोरात उपस्थित होते. रामनाथ कोविंद यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४५ हे भारताचे १४ वे राष्ट्रपती २०१७-२०२२आणि एक प्रतिष्ठित वकील व राजकारणी आहेत. उत्तर प्रदेशातील कानपूर देहात जिल्ह्यातील परौंख गावात जन्मलेले कोविंद, राष्ट्रपती होणारे भारतीय जनता पक्षाचे पहिले सदस्य आणि दलित समुदायातील दुसरे व्यक्ती आहेत. राष्ट्रपती होण्यापूर्वी त्यांनी बिहारचे राज्यपाल म्हणून काम पाहिले होते. त्यांना समाजातील दलित आणि मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी लढणारे नेते म्हणून ओळखले जाते.कोविंद यांनी राष्ट्रपती म्हणून आपल्या कार्यकाळात राष्ट्रपती भवनात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते.



## हरवलेला चिमुकला पोलिसांच्या तत्परतेमुळे सुखरूप सापडला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ओतूर बाजारपेठेतून सकाळपासून बेपत्ता झालेला साडेतीन वर्षांचा चिमुकला ओतूर पोलिसांच्या तत्पर शोधमोहिमेमुळे अवघ्या काही तासांत सुखरूप सापडला. आकाश प्रकाश केदार असे या मुलाचे नाव आहे. वाघदरा, ता. जुन्नर येथील शेतमजूर प्रकाश किसन केदार वय २५ यांनी आज सकाळी ओतूर पोलीस स्टेशनला धाव घेतली. त्यांचा मुलगा आकाश याला बाजारपेठेतून एका महिलेने नेल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली.

तक्रार मिळताच पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने हालचाल केली. बाजारपेठ, बस स्थानक , के.टी. बंधारा परिसर व मार्केट यार्ड येथे तपास पथके रवाना करण्यात आली. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आकाश त्याच्या आजीसोबत जात असल्याचे दिसून आले.



आजीजवळ मोबाईल नसल्याने संपर्क होत नव्हता. पोलिसांनी आजीचा शोध घेऊन आकाशला ताब्यात घेतले व त्याच्या वडिलांकडे सुखरूप सुपूर्द केले. मुलगा सुखरूप असल्याचे पाहून केदार कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या शोधमोहिमेत पोलीस हवलदार नरेंद्र गोराणे, दिनेश साबळे, देविदास खेडकर, मयुरी खोसे,विशाल गोडसे, योगेश उर्किडे, जोतिराम पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ओतूर पोलिसांच्या या जलद कारवाईचे नागरिकांतून कौतुक होत आहे.

## संस्थानच्या प्रसादालयात कनिष्ठ दर्जाच्या किराण्याचा वापर, 'महाप्रसादावर प्रश्नचिन्ह'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** बाबांचा प्रसाद म्हणून डोळे मिटून कडूला गोड म्हणून खाणारे साई भक्तांच्या मुखी कनिष्ठ दर्जाचा माल घालण्याचे महापाप उघड झाले असून माहीती अधिकार कार्यकर्ते संजय काळे यांनी हा गोरखधंदा उघड केल्याने संस्थान च्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगण्याचा महाप्रकार उघडकीस आला आहे .साईबाबा संस्थान प्रसादालयात रोज सरासरी चाळीस हजार भक्त महाप्रसादाचे सेवन करतात.. दर वर्षी अंदाजे सत्तर ते शंभर कोटी रूपयांचा किराणा खरेदी करण्यात येतो .साईबाबा संस्थान अन्न व औषध प्रशासन यांचेकडून प्रत्येक माल तपासून घेते.. ''खाण्यासाठी योग्य '' असा दाखला संस्थान मिळवते व वापर चालू होतो. संस्थान कोट्यावधी रुपयांचा किराणा माल खरेदी करत असताना प्रसादालयात दिले जाणारे जेवण बेचव का? म्हणून संजय काळे यांनी प्रसादालयात वापरल्या जाणाऱ्या किराणा मालाची चौकशी करण्याचे ठरवले . याबाबत काळे यांनी कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर



मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपल्या प्रसादालयात कनिष्ठ दर्जाचा किराणा माला चा वापर होत असल्याचे निदर्शनास आणून दिले असता गाडीलकर यांनी काळेंना सांगीतले की, तुम्हाला पंचनामा करुन नमुने देण्याचे कबूल केले . त्यानुसार काळे हे दि . ७ मे २०२६ रोजी माहिती च्या अधिकारात खरेदी केलेला किराणा माल पहाण्यासाठी श्री साईबाबा संस्थान चे भांडार व खरेदी विभाग व प्रसादालयात गेले तिथे असलेल्या भांडारातुन मूग, धने, जिरे, चवळी, काबुली चना, गहू, तांदूळ,तूर दाळ, काजू, किसमिस, लवंग, हरबरे, छोले, रवा , हरभरा डाळ, शेंगदाने साखर इ. असे १७ किराणा मालाचे नमुने स्वतंत्र प्लास्टिक बॅग मध्ये घेतले. माल कोणत्या गोणी तून घ्यायचे हे स्वातंत्र्य अधिकारी व कर्मचारी यांना दिले होते. सदर नमुने घेऊन मी खरेदी विभागात गेलो. खरेदी विभागाने मला ठेकेदाराने दिलेल्या नमुन्यांच्या बरण्या दाखवल्या असता बरण्यांमध्ये असलेले नमुने हे प्रत्येक मालाच्या ''अ'' दर्जाचे होते व प्रत्यक्षात खरेदी केलेला माल ''क'' दर्जाचा होता. सदर घटनेवरून पुरववठा झालेला माल हा निविदा प्रमाणे ठरलेल्या दर्जाचा असल्याची खातरजमा कधीच होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे .

### तक्रार खरा आम्ही कारवाई करु : भोसले

सदर बाब प्रशासकीय अधिकारी संदीप भोसले यांच्या दोन्ही नमुने दाखवून निदर्शनास आणून दिली असता तुम्ही या विषयी तक्रार दाखल करा आम्ही संबंधितांवर, दोषींवर कारवाई करू असे आश्वासन दिले आहे. आता या घोटाळ्यात कुणा कुणाचे हात बरबटलेले आहेत व कुणा कुणावर कारवाई होणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### पापाचे वाटेदार कोण?

जगभरातून येणारे करोडो भक्त साई बाबांवर अंध विश्वास ठेवून शिर्डीत येत असतात . तसेच तिजोरीत भरभरून दान दिले जाते या दानातून संस्थान भक्तांना सुविधा देत असल्याचा दावा करत असतात. येणाऱ्या दानातून भक्तांना फूकट जेवण दिले जाते. परंतू बाबाच्या दानावर डल्ला मारून काहीजण भक्तांच्या अन्नात माती कालवण्याचे महापाप करत असून या पापाच्या वाटेदारांना संस्थान धडा शिकवेल का ?हा प्रश्न अनुत्तरित आहे.

## जावई धोंडा अन् आमरसाची मेजवानी

### भैरवनाथ देवस्थानाचा उपक्रम, लेक-जावयाला पाचीपोषाख करणार

**अहिल्यानगर:** तालुक्यातील आगडगाव येथील काळ भैरवनाथ देवस्थानच्या वतीने अधिकमासानिमित्त जावयांसाठी धोंडा जेवण उपक्रम राबविण्यात येणार आहे. रविवारी (ता. १७) दुपारी १२ वाजता महाआरतीनंतर उपक्रमास सुरुवात होईल, असे देवस्थान ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले. अधिक मासानिमित्त अन्नदानाला विशेष महत्त्व आहे. जावयाला धोंडा जेवण देण्याची परंपरा आहे. देवस्थानाच्या वतीने अनेक वर्षांपासून असा उपक्रम राबविण्यात येतो. आगडगाव व पंचक्रोशीतील रतडगाव, देवगाव, खांडके, कापूरवाडी, बुऱ्हाणनगर, कोल्हार, डमाळवाडी अशा गावांबरोबरच नगर शहर व राज्यभरातून भाविक या अन्नदानासाठी नावनोंदणी करतात. नोंदणी झाल्यानंतर लगेचच संबंधित लेक व जावयाला पाचीपोषाख दिला जातो. त्यामध्ये पैठणी, तांब्याचे ताट, निरंजन, अनारसे, बत्ताशे, जावयाला कुर्ता-पायजमा, टोपी, पंचा आदींचा समावेश आहे. देवस्थानाजवळ येऊन नाव नोंदणी करून लगेचच पाचीपोषाख ताब्यात दिला जातो. या उपक्रमानिमित्त भाविकांना नगरहून येण्यासाठी एसटीच्या जादा बसची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच देवस्थानची बसही सेवेत असेल. उन्हापासून संरक्षण होण्यासाठी सावलीची व्यवस्था, स्वच्छ पाणी, प्रशस्त पार्किंग असे नियोजन करण्यात आले आहे.

**साडेतीन हजार किलो आंबे**

धोंडा, रस या उपक्रमासाठी साडेतीन हजार किलो आंबे खरेदी करण्यात येणार आहेत. पुरण-पोळी, धोंडा यासाठी एक हजार किलो डाळीचे नियोजन आहे. शंभर अन्नदात्यांचा समावेश करण्याचे नियोजन आहे. प्रथम नावनोंदणी करणारास प्राधान्य दिले जाणार आहे. मागील तीन वर्षांपूर्वी राबविलेल्या या उपक्रमात सुमारे २० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला होता. या वर्षीही मोठ्या प्रमाणात भाविक येणार आहेत. त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे.

## समताने कोणतीही शाखा बंद केली नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** गेल्या ४० वर्षांपासून सहकार क्षेत्रात विश्वासार्ह कार्य करणारी समता नागरी सहकारी पतसंस्था ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीपणे कार्यरत आहे. मात्र, सोशल मीडियावर प्रसारित होत असलेल्या काही अपूर्ण आणि चुकीच्या माहितींमुळे संस्थेबाबत गैरसमज पसरवले जात असल्याचे समता पतसंस्थेकडून सांगण्यात आले. संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी पुढे सांगितले की, समता पतसंस्थेची शाखा पाथर्डी येथे नाही. समता पतसंस्था व समता मल्टीस्टेट या दोन वेगवेगळ्या संस्था आहेत. मात्र व्हिडिओमध्ये समता पतसंस्थेचा नामोल्लेख करण्यात आलेला आहे. व्हिडिओमध्ये पाथर्डी येथील समता मल्टीस्टेटची शाखा दाखवण्यात आली व समता पतसंस्थेचा नामोल्लेख करण्यात आलेला आहे ही बाब चुकीची आहे. याबाबत आम्ही निषेध व्यक्त करत आहोत. तसेच चुकीच्या व विपर्यास्त अफवा पसरवणाऱ्यांवर आम्ही कायदेशीर कारवाई देखील करणार आहोत. तसेच पाथर्डी येथील उषाताई बढे ही मल्टीस्टेट पतसंस्था अडचणीत आली होती. ती बंद पडलेली संस्था दत्तक घेऊन हजारो ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवी व्याजासह परत केल्या आहेत. सोनेतारण कर्जाची देखील एकही कलम शिल्लक नाही. सर्व ठेवीदारांच्या ठेवी परत केल्यानंतर ३१ मार्च २०२६ अखेर ही शाखा बंद करण्यात आली मात्र या शाखेतील फर्निचर अद्यापही त्या ठिकाणी होते. शाखेतील फर्निचर शिफ्ट करताना चुकीचे व्हिडिओ चित्रण करून चुकीच्या बातम्या दाखवण्यात आल्या आहे. पाथर्डी येथील व्हिडिओ चित्रीकरणात समता पतसंस्थेचा काहीही संबंध नाही.

मात्र, सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अपूर्ण व चुकीच्या माहितीमुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.ग्राहकांनी अधिकृत माहितीसाठी थेट संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन करताना समता नागरी सहकारी पतसंस्था पारदर्शक कारभार, विश्वासार्ह सेवा आणि ग्राहकाभिमुख कार्यपद्धतीमुळे आजही ग्राहकांचा दृढ विश्वास टिकवून असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.

## निघोज ग्रामपंचायत निवडणुकीत तिसऱ्या आघाडीची चाचपणी

### वराळ-लंके गटांना आव्हानाची चिन्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज,** पारनेर तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांची रणधुमाळी लवकरच सुरू होण्याची शक्यता असून तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्येची निघोज ग्रामपंचायत निवडणूक यंदाही चुरशीची होणार असल्याचे चित्र आहे. वराळ आणि लंके गटांसमोर आता तिसऱ्या आघाडीचे आव्हान उभे राहत असून आमदार काशिनाथ दाते यांच्या समर्थकांकडून स्वतंत्र आघाडीची चाचपणी सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. निघोज ग्रामपंचायतीत सहा प्रभाग असून एकूण १७ सदस्यसंख्या आहे. मतदारसंख्या सुमारे १५ हजारांच्या घरात आहे. यंदा सरपंचपद अनुसूचित जातीसाठी आरक्षित झाले असून तब्बल ६५ वर्षांनंतर अल्पसंख्याक समाजातील व्यक्तीस सरपंचपदाची संधी मिळणार आहे. त्यामुळे निवडणुकीत उत्सुकता वाढली आहे. तीन पॅनलमधून सुमारे ५१ उमेदवारांसह काही अपक्ष मिळून एकूण ६० जण निवडणूक रिंगणात



उतरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. गत निवडणुकीत तिसऱ्या आघाडीचा प्रयोग अयशस्वी ठरला होता. मात्र यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष ॲड. बाळासाहेब लामखडे तसेच जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद यांच्या माध्यमातून तिसरी आघाडी सक्षमपणे उभी राहू शकते, अशी चर्चा आहे. गत पंचवार्षिकमध्ये खासदार नीलेश लंके यांचे समर्थक ठकारामशेठ लंके यांना सरपंचपदाची संधी मिळाली होती. त्यानंतर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील समर्थक गटाच्या चित्राताई वराळ पाटील यांनी सरपंचपद भूषविले. त्यांच्या नेतृत्वाखाली तसेच सचिन पाटील वराळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीत मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाल्याचा दावा करण्यात येत आहे. याच विकासकामांचा फायदा वराळ गटाला होण्याची शक्यता असली तरी तिसऱ्या आघाडीमुळे समीकरणे बदलू शकतात. आमदार दाते यांचे कार्यकर्ते कोणती भूमिका घेतात, तसेच नाराज कार्यकर्त्यांना कोण आपल्या गोटात घेतो यावर निकाल अवलंबून राहणार आहे. दरम्यान, प्रभागरचनेत फेरफार झाल्याने काही मतदारसंघांची नव्याने विभागणी करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. सरपंचपदासोबतच उपसरपंचपदासाठीही मोठी चुरस अपेक्षित असून प्रत्येक प्रभागातील इच्छुकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. तिरंगी लढतीची शक्यता निर्माण झाल्याने निघोज ग्रामपंचायत निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.






## अल्पवयीन मुलीची छेड काढणारा आरोपी पुण्यातून जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीची छेड काढुन तिला मिठीत कवटाळणारा आरोपीला राहुरी पोलीसांनी पुण्यात शोध घेऊन त्याला जेरबंद केले आहे. या संदर्भातील हकीकत अशी की,एक १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी घरी एकटीच असल्याचा गैरफायदा घेऊन तिची छेड काढून तिला मिठीत घेत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी राहुरी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यानुसार गुरन २९१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ७४,७५,७८,७९ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ८,१२ प्रमाणे दिनांक ३० मार्च २०२६ रोजी गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. सदरील गुन्हा दाखल झाल्यापासून या गुन्ह्यातील आरोपी अय्याज उर्फ वसीम अक्रम आयुब पठाण (वय २२ वर्षे) हा पसार झाला होता. परंतु राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे मुलींच्या बाबतीत अलर्ट असल्याने त्यांनी या गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन त्या आरोपीचा पिच्छा सोडला नाही. त्या आरोपीच्या शोधाकरिता २ पथके नेमण्यात आली होती, परंतु एक महिना एक आठवडा गुन्ह्यास होऊनही कोणतीही तांत्रिक माहिती उपलब्ध नसल्याने सदर आरोपीला अटक करता आले नव्हते. दि.६ मे २०२६ रोजी रात्री ८:०० चे सुमारास त्या आरोपी संदर्भात पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की, सदर आरोपी हा त्याचे अस्तित्व लपवण्यासाठी गुन्हा केल्यापासून पुणे येथे असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. सदरची गोपनीय माहिती पोलिस अधीक्षक यांना कळवून त्यांचे परवानगीने पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव , पो.हे.कॉ. सुरज गायकवाड, पो.कॉ. गणेश लिपने यांचे पथक नेमले या पथकाने सदर आरोपीचा मध्यरात्री २:०० वाजता पुणे शहरात शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन राहुरी पोलीस स्टेशनला आणून अटक करण्यात आली आहे.पोलिस कस्टडी रिमांड करिता अहिल्या नगरच्या सत्र न्यायालय पुढे हजर करण्यात आले आहे. सदर कारवाई अहिल्यानगरचे



पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, सोमनाथ वाघचौरे अपर पोलिस अधीक्षक श्रीरामपूर, जयदत्त भवर उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपुर विभाग जि. अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे राहुरी पोलीस स्टेशन यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राजु जाधव, पो.हे.कॉ. सुरज गायकवाड , पो.हे.कॉ. संभाजी बडे, पो.कॉ. गणेश लिपने,पो.कॉ. संतोष शिंदे, पो.कॉ. प्रमोद ढाकणे,पो.कॉ. अंकुश जाधव, पो.हे.कॉ. संतोष दरेकर सायबर सेल श्रीरामपूर यांनी केली आहे.

## शेवगाव-पाथर्डी नगरपरिषदांना अग्निशमन गाड्या प्राप्त

### उशिरामुळे श्रेयवाद, भविष्यात प्रभावी वापराची अपेक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत राज्यातील सर्व नगरपरिषदांसाठी राबविण्यात आलेल्या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदांना अग्निशामन गाडी देण्यात आली. त्यामुळे शेवगाव व पाथर्डी नगरपरिषदांना अखेर अग्निशमन गाड्या प्राप्त झाल्या असून त्यांचे लोकार्पण करण्यात आले. उपलब्ध अधिकृत पत्रव्यवहारावरून ही गाडी मिळण्याची प्रक्रिया काही महिन्यांपूर्वीच सुरू झालेली असल्याचे स्पष्ट होत आहे.

शासनाने ऑक्टोबर २०२५ पासूनच मिनी रेस्क्यू टेंडर विथ फायर फाइटिंग कॅपॅबिलिटीज या योजनेअंतर्गत गाड्यांच्या निर्मिती व पुरवठ्याचे आदेश दिले होते. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये नगरपरिषदांकडून आवश्यक कागदपत्रे, चेसिस नोंदणी, ऋड्ढ व झअछ क्रमांक यांची पूर्तता करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. या सर्व प्रक्रियेनंतरच संबंधित गाड्यांचे वितरण करण्यात आले आहे.

दरम्यान, शेवगाव नगरपरिषद निवडणूक होण्यापूर्वीच ही प्रक्रिया सुरू होती. परंतु स्थानिक पातळीवर पाठपुराव्याचा अभाव आणि प्रशासकीय विलंबामुळे गाडी उशिरा मिळाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी शेवगावमध्ये जि.प. मराठी मुलींची शाळा ,पेशवेकालीन गणेश मंदिर जुने कोर्ट , व बॉम्बे मशिनरी शेवगाव या ठिकाणी मोठी आग लागल्याची घटना घडली होती. लाखो रुपयांचे नुकसान या आगीमध्ये झाले होते.त्या वेळी जर अग्निशमन गाडी उपलब्ध असती, तर नुकसान काही प्रमाणात टाळता आले असते.

आज मात्र नगरपरिषद स्तरावर पाठपुरावा सुरू नसताना सुद्धा महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व नगरपरिषदांना एकत्रितपणे या गाड्या उपलब्ध करून दिल्या आहेत. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील दोन्ही नगरपरिषदांना या गाड्या मिळाल्याने आपत्कालीन सेवांमध्ये मोठी भर पडणार आहे.

नागरिकांच्या दृष्टीने ही सुविधा अत्यंत महत्त्वाची असून भविष्यात आग व इतर आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळणार आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने या अग्निशमन गाडीचा योग्य व प्रभावी वापर करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. खरंतर शेवगाव शहराला एका फायर स्टेशनची गरज आहे यासाठी नगरसेवकांचा शेवगाव पाथर्डी मतदारसंघाच्या आमदार मोनिकाताई राजळे यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू आहे. लवकरात लवकर शेवगाव शहराला एक फायर स्टेशन उपलब्ध होऊन विस्तृतपणे वाढलेल्या गजबजलेली व्यापार पेठ असलेल्या व लाखाच्या आसपास लोकसंख्या असलेल्या शहराला फायर स्टेशन व मोठी फायर ब्रिगेड ची गाडी व प्रशिक्षित कर्मचारी यांची गरज आहे. आमदार मोनिकाताई राजळे यांच्या पाठपुराव्यातून शासनाकडून लवकरात लवकर फायर स्टेशन मंजूर करण्यासाठी सुद्धा प्रयत्न सुरू आहे. अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे डॉ. नीरज अरुण लांडे यांनी दिली.




## विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर गुन्हे दाखल करा, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असून विद्यार्थ्यांची फसवणूक आणि शैक्षणिक नुकसान कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रशासनाला दिले आहेत.

वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या फसवणुकीच्या प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषींवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले. या महाविद्यालयात १३२ हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम व पदव्या देऊन फसविण्यात आल्याचे उघड झाले आहे.

सदर संस्थेत मान्यताप्राप्त वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या नावाखाली विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता नसलेला अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र राज्य अनधिकृत संस्था व अभ्यासक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अंतर्गत कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यार्थी व पालकांना



आवाहन करताना सांगितले की, कोणत्याही संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित अभ्यासक्रमाची मान्यता उच्च शिक्षण संचालनालय, तंत्रशिक्षण संचालनालय किंवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर तपासूनच प्रवेश घ्यावा.

भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी विशेष कार्यप्रणाली तयार करण्याचे आदेशही देण्यात आले. तसेच फसवणूक झालेल्या १३२ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील 'ठशलेसपळींळेप`ष झॲळेॲ डशरॲपळपस' या तरतुदीनुसार योग्य निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीस प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मुंबई विद्यापीठ चे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी आदी अधिकारी उपस्थित होते.